## सत्र-१ : घटक ४

# चलनवाढीचे मौद्रिक आणि अमौद्रिक सिद्धांत व स्थिरीकरण धोरण


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

 ४.२.१ व्यापार चक्रांच्या अवस्था

 ४.२.२ व्यापार चक्राचे सिद्धांत : हॉट्रे, हायेक, शुम्पिटर आणि केन्स

 ४.२.३ स्थिरीकरण धोरण : उद्दिष्टे व मर्यादा

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द

४.५ सरावासाठी प्रश्न

४.६ अधिक वाचनासाठी संदर्भ


## ४.० उद्दिष्ट्ये (Objectives) :

१) व्यापार चक्रांच्या अवस्था स्पष्ट करणे.

२) व्यापार चक्राची वैशिष्ट्ये स्पष्ट करणे.

३) व्यापार चक्राचे सिध्दांतः हॉट्रे, हायेक, शुम्पिटर आणि केन्स यांचे सिध्दांत स्पष्ट करणे.

४) स्थिरीकरण धोरणाची उद्दीष्ट्ये व मर्यादा स्पष्ट करणे.

## ४.० उद्दिष्ट्ये (Objectives) :

अर्थव्यवस्थेत काही वेळा किंमतीत वाढत होत असताना उत्पादनातही वाढ होत असते. कामगारांची मागणी वाढत असते, आर्थिक उत्पादन वाढत असते व सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण होत असते. यालाच तेजीची अवस्था असे म्हणतात. याउलट वस्तुच्या किंमती कमी होतात, उत्पादन घटते, नफा घटतो व उत्पादन घटल्यामुळे कामगारांची बेकारी निर्माण होते या परिस्थितीला मंदी असे म्हणतात. अर्थव्यवस्थेत तेजी नंतर मंदी आणि मंदीनंतर तेजी असा क्रम चालु राहतो. यालाच तेजी मंदी चक्र किंवा व्यापार चक्र असे म्हणतात. व्यापारचक्र ही अल्पकालावधीची व दिर्घकालावधीची असतात. व्यापार चक्रांचा शास्त्रशुध्द अभ्यास प्रथमतः क्लेमेद व जुगलर यांनी केला, त्यानंतर निचेल हॉट्रे हायेक रॉबर्टसन, शुम्पिटर, केन्स इत्यादींनी व्यापार चक्राचे सिध्दांत मांडले. अर्थव्यवस्थेत असलेल्या गतिमान शक्ति वेगवेगळया प्रकारचे आर्थिक चढउतार किंवा स्थित्यंतरे निर्माण करतात. त्यांच्या ठळक वैशिष्टयांनुसार त्यांचे दीर्घकालीन प्रवृत्ती, हंगामी चढउतार, चक्रीय चढउतार आणि यादृच्छिक चढ-उतार असे एकूण चार प्रकारात वर्गीकरण केले जाते. यातील चक्रीय चढ-उतारांना व्यापार चक्रे असे म्हणतात. ते अर्थव्यवस्थेच्या कार्यपध्दतीत अनेक अडथळे निमार्ण करतात. त्यामुळे व्यापार चक्रांच्या अभ्यासास अधिक महत्व आहे.

व्यापार चक्र या संकल्पनेचा अर्थ अर्थशास्त्रात, अर्थव्यवस्थेतील लाटांसारख्या एकूण आर्थिक व्यवहारात होणाऱ्या चढ-उतारांना चक्रे म्हणतात. आर्थिक व्यवहारातील चढ-उतारांना व्यापारचक्रे असे म्हणतात. व्यापार चक्रे या संकल्पनेचा अर्थ पुढील व्याख्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल. अर्थव्यवस्थेत असलेल्या गतिमान शक्ती वेगवेगळया प्रकारचे आर्थिक चढ-उतार किंवा स्थित्यंतरे निर्माण करतात. त्यांच्या ठळक वैशिष्टयांनुसार त्यांचे दिर्घकालीन प्रवृत्ती, हंगामी चढ-उतार, चक्रीय चढउतार आणि यादृच्छिक चढउतार असे एकूण चार प्रकारात वर्गीकरण केले जाते. यातील चक्रीय चढ-उतारांना व्यापार चक्रे असे म्हणतात. ते अर्थव्यवस्थेच्या कार्यपध्दतीत अनेक अडथळे निर्माण करतात. त्यामुळे व्यापार चक्रांच्या अभ्यासास अधिक महत्व आहे.

व्यापार चक्र संकल्पनेचा अर्थ अर्थशास्त्रात, अर्थव्यवस्थेतील लाटांसारख्या एकूण आर्थिक व्यवहारात होणाऱ्या चढ-उतारांना व्यापार चक्रे म्हणतात. आर्थिक व्यवहारातील चढ-उतारांना व्यापार चक्रे असे म्हणतात.

व्यापार चक्रे का अत्सित्वात येतात याविषयीची अर्थशास्त्रज्ञांनी अनेक कारणे दिलेली आहेत काही अर्थशास्त्रज्ञांच्या मते, अति-गुंतवणूकीमुळे व्यापार चक्रे अस्तित्वात येतात काहींच्या मते, नवप्रर्वतनामुळे व्यापार चक्रे निर्माण होतात. काहीं तज्ञांच्या मते, न्यून उपभोगामुळे व्यापार चक्रे निर्माण होतात.

**१. प्रा. हॅबलर्र –** ''व्यापार चक्र म्हणजे उत्तम किंवा वाईट व्यापाराची, तेजी किंवा मंदीच्या कालावधीत स्थित्यंतरे होय.''

"The business cycle is an alternation of periods of prosperity and depression of good and bad trade."

**२. प्रा. केन्स –** ''व्यापार चक्र म्हणजे वाढत्या किंमती व अल्प बेकारीचे प्रमाण वैशिष्ट्ये असलेली उत्तम

व्यापाराच्या स्थितीचे स्थित्यंतर, घटत्या किंमती व उच्च बेकारीचे प्रमाण वैशिष्ट्ये असलेल्या वाईट व्यापार स्थितीत होणे होय.''

"A trade cycle is composed of good trade characterized by rising prices and low unemployment percentages, altering with periods of bad trade characterized by falling prices and high unemployment percentages."

**३. मिचेल -** ''एकूण आर्थिक व्यवहारातील चढ-उतारांना व्यापार चक्रे असे म्हणतात.''

"A fluctuation in aggregate economic activity is a trade cycle."

व्यापार चक्राचे अनेक सिध्दांत असून, त्यांचे मौद्रिक आणि अमौद्रिक प्रकारात वर्गीकरण केले जाते. पुढील प्रमुख व्यापार चक्र विषयक सिध्दांताचा अभ्यास करणे अपेक्षित आहे.

**व्यापार चक्राचे स्वरूप (Nature of Trade Cycle) :**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे व्यापार चक्र हे एक अंग आहे. हे व्यापार चक्र तेजी व मंदी ह्या दोन अवस्थांशी संबंधीत असते. व्यापार चक्राच्या कालावधीत एकूण रोजगार, उत्पन्न, उत्पादन व किंमत पातळी ह्यांच्यात लाटांप्रमाणे उतार - चढाव होत असतात. व्यापार चक्राबाबत लक्षणीय बाब म्हणजे कोणतेही चक्र हे एकरुप, वारंवार येणार व विस्तारयुक्त असे पुर्णपणे नियमित नसते. उत्पादनाच्या एका टोकावरुन दुसऱ्या टोकावर नेहमीच सारखा वेळ लागतो असे नाही. तसेच उत्पादन व रोजगार ह्यांची पातळी उर्ध्वगामी व अधोगामी वळणावरील बिंदूंमध्ये एकाच प्रमाणात परिवर्तीत होते असे नाही. अशा प्रकारे व्यापार चक्रात एकूण रोजगार उत्पन्न, उत्पादन व किंमत पातळी ह्यात आवर्ती उतार - चढ किंवा उच्चावचेन होतात.

**व्यापार चक्रांची वैशिष्टये (Characterists of Trade Cycles) :**

**(१) निश्चित कालावधी :** काही प्रमुख अर्थशास्त्रज्ञांच्या मते व्यापार चक्रे ही एका विशिष्ट कालावधीशी संबंधीत असतात. तेजी मंदीचे चक्र हे निश्चित कालावधीत पूर्ण होत असते. हॅनसन यांच्या मतानुसार व्यापार चक्रांचा अवधी हा सामान्यतः ७ ते १० वर्षांचा असतो.

**(२) सर्वसमावेशक घटना :** तेजीच्या काळात तेजी ही देशाच्या सर्व भागात अत्सित्वात असते; तर मंदीच्या काळात मंदी ही देशाच्या सर्व भागात दिसून येते. काही भागात तेजी तर त्याचवेळी काही भागात मंदी अशी परिस्थिती सामान्यतः नसते.

**(३) आर्थिक जगातील एक सर्वसाधारण घटना :** व्यापार चक्र ही अर्थव्यवस्थेत घडणारी सर्वसामान्य घटना आहे. काही अर्थशास्त्रज्ञांच्या मते ही एक नैसर्गिक घटना असून तिचे नियंत्रण करणे कठीण काम आहे.

**(४) चढ-उतार समान नसतात :** तेजीच्या अवस्थेकडून मंदीच्या अवस्थेकडे जाण्यास कमी कालावधी लागतो; तर मंदीच्या अवस्थेतून तेजीच्या अवस्थेकडे जाण्यास जास्त कालावधी लागतो.

**(५) संचयी स्वरुप :** तेजी व मंदीचे स्वरुप हे संचयी असते. प्रत्येक अवस्थेत अशी काही तत्वे एकत्र येतात ती त्या-त्या अवस्थेला विरुध्द टोकाला घेऊन जातात. तेजी व मंदीचा कालावधी नियमित किंवा निश्चित नसला तरी एवढे निश्चित असते की तेजी किंवा मंदी ही अनिश्चित कालापर्यंत चालू राहत नाही.

**(६) तेजी-मंदीचे व्यापार चक्र लाटेसारखे असते :** समुद्रात ज्याप्रमाणे भरती व ओहोटी यांचे चक्र सुरु असते, त्याचप्रमाणे अर्थव्यवस्थेत तेजी व मंदीचे चक्र सुरु असते. भरतीनंतर ओहोटी व ओहोटीनंतर भरती असा क्रम असतो, त्याचप्रमाणे तेजीनंतर मंदी व मंदीनंतर तेजी असे रहाटगाडगे सूरु असते.

**(७) घडून येणारे बदल सर्वत्र सारखे नसतात :** व्यापार चक्रामुळे अर्थव्यवस्थेत जे बदल घडून येतात ते सर्वत्र सारखे नसतात. निरनिराळया भागात निरनिराळया प्रमाणात बदल घडून येतात. व्यापार चक्राच्या अवस्थेत भांडवली वस्तूंच्या उद्योगात घडून येणारे बदल हे मोठया प्रमाणात असतात; तर उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनात घडून येणारे बदल हे तुलनेने कमी प्रमाणात असतात.

**(८) व्यापार चक्र हे आंतरराष्ट्रीय स्वरुपाचे असते :** व्यापार चक्राचे अस्तित्व हे केवळ एका देशापुरते सीमित नसून विदेशातही असते. व्यापार चक्र हे निरनिराळया राष्ट्रांमध्ये फैलावत असते. व्यापार चक्राची लागण ही एका राष्ट्रातून इतर राष्ट्रांमध्ये होत असते. अशाप्रकारे व्यापार चक्र हे आंतरराष्ट्रीय क्षेत्र व्यापते.

**(९) व्यापारचक्राची तीव्रता सर्वत्र समान नसते :** वर्तमानकालीन व भूतकालीन व्यापार चक्र हे कालावधीच्या दृष्टीने समान नसतात. तशीच ती तीव्रतेच्या दृष्टीनेही समान नसतात.

**व्यापार चक्रांचे प्रकार (Types of Trade Cycles) :**

व्यापार चक्रांचे वर्गीकरण हे सामान्यतः पुढील प्रमाणे करण्यात येते.

**(१) अल्प 'किचीन' चक्र :** हे ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ जोसेफ किचीन यांच्या नावाने प्रसिध्द आहे. यास लघु चक्र असेही म्हणतात व हे साधारणतः ४० महिन्याच्या कालावधीचे असते. प्रा. कियीन यांनी सन १९२४ मध्ये मोठे चक्र व लघु चक्र यातील फरक स्पष्ट केला. आपल्या संशोधनाच्या आधारे त्यांनी निष्कर्ष काढला की मोठे व्यापार चक्र हे ४० महिन्यांच्या दोन किंवा तीन चक्रांचे असते.

**(२) दीर्घ जुग्लर चक्र :** हे चक्र म्हणजे लागोपाठ येणाऱ्या किंवा अनुक्रमिक संकटांमधील उतार-चढ आहेत. सन १८६२ मध्ये फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ Clement Juglar यांनी स्पष्ट केले की, भरभराट, संकट व अवसायन यांचा कालावधी हा नेहमी एकाच क्रमात एकानंतर दुसरा अशातऱ्हेने येतो. पाश्चात्य अर्थशास्त्रज्ञांच्या मते जुग्लर चक्राचा कालावधी सरासरीने साडे-नऊ वर्षांचा असतो. या चक्राला मोठे चक्र असेही म्हणतात.

**(३) अतिदिर्घ 'कोन्ड्राटिफ' चक्र :** चक्रांच्या अतिदिर्घ अशा लाटा असून त्यांचा कालावधी ५० वर्षांपेक्षा अधिक असून हे सहा जुग्लर चक्रांनी मिळून बनलेले असते असा निष्कर्ष रशियन अर्थशास्त्रज्ञ कोन्ट्राटिफ ह्यांनी काढला. अतिशय दिर्घ चक्राला कोन्ट्राटिफ लाटा असे म्हणण्यात येऊ लागले.

**(४) भवन निर्मितीशी संबंधित चक्र :** ज्यांचा कालावधी बराच नियमित असतो व जे भवन-निर्माणाशी

संबधित असतात त्यांना भवनसंबंधी चक्र असे म्हणतात. या चक्रांचा कालावधी मोठया चक्रांच्या दुप्पट व सरासरी १८ वर्षांचा असतो. ही व्यापार चक्रे Warram व Pearson या दोन अमेरिकन अर्थशास्त्रज्ञांच्या नावाशी संबंधीत आहेत. त्यांनी १९३७ मध्ये "World - Price & The Building Industry" हे पुस्तक प्रसिद्ध करून वरील निष्कर्ष मांडले.

**(५) कुझनेट्स चक्र** : अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ प्रो. सायमन कुझनेट्स यांनी १६ ते २२ वर्षीय दीर्घकालीन उतार-चढाव नावाचे व्यापार चक्र प्रस्तुत केले. त्या चक्राची मांडणीच अशी केली आहे की ते ७ ते ११ वर्षीय चक्रांचे महत्व कमी करते.

### ४.२.१ व्यापार चक्रांच्या अवस्था (Phases of Trade Cycle) :

प्रो. बर्न्स आणि प्रो. मिचेल यांनी आपल्या "Measuring Business Cycles" या ग्रंथात व्यापार चक्राच्या तेजी, घसरण, मंदी आणि पुनरुज्जीवन अशा चार अवस्था सांगितल्या आहेत.


१. तेजी (Boom)

२.घसरण (Recession)

३. मंदी (Depression)

४. पुनरुजीवन (Recovery)

व्यापार चक्राची सुरुवात कोणत्याही अवस्थेतुन होते. तेजीला कलाटणी मिळून पुनरुज्जीवन व त्यातून पुढे मंदी तेजी अशाप्रकारे तेजी, घसरण, मंदी पुनरुज्जीवन या व्यापारचक्रांच्या चार अवस्था निर्माण होतात.




आकृतीमध्ये दाखविल्याप्रमाणे अ य अक्षावर आर्थिक उलाढाल व अ क्ष अक्षावर कालखंड (अवस्था)

दाखविले आहे. सुरुवातीला पुनरुजिवन अवस्था दाखविले आहे. नंतर तेजीची अवस्था नंतर घसरण व शेवटी मंदी पुन्हा पुनरुजीवन दाखविले आहे.

व्यापार चक्राच्या अवस्था या एका पाठोपाठ एक क्रमाने अशा येतात. एकदम तेजी किंवा मंदी येत नाही तर तेजीनंतर घसरण त्यातुन मंदी पूनरुज्जीवन व पुन्हा तेजी येत असते. अर्थात व्यापार चक्राची सुरुवात कोणत्याही अवस्थेतून होऊ शकते.

विभिन्न चक्रांच्या परिस्थितीत या चार अवस्था आवर्ती (Recurring) व एकरुप (Homogeneous) असतात. परंतु कोणत्याही अवस्थेचा निश्चित असा कालावधी किंवा समय अंतराळ (Time Interval) नसतो. याबाबत प्रो. पिगु म्हणतात, या अवस्था म्हणजे जुळे भाऊ नसतीलही परंतू त्या एकाच परिवारातील (Family) आहेत. त्या परिवाराची सर्वसाधारण वैशिष्टये यांच्यात आढळतात व त्यांचे वर्णनही शक्य आहे. गर्त किंवा खोलीतील अगदी खालच्या तळाच्या बिंदूपासून सुरुवात होऊन व्यापार चक्र हे पुनरुत्थान व समृध्दीची अवस्था पार करुन शिखर किंवा कळस गाठते; नंतर सुस्ती किंवा मंदीच्या अवस्थेच्या माध्यमातून खाली घसरत गर्तपर्यंत किंवा तळापर्यंत (खालच्या बिंदूपर्यंत) पोहचते.

### १. तेजी (Boom) :

तेजीच्या परिस्थितीत अर्थव्यवस्थेत सर्वत्र उत्साहाचे वातावरण पसरलेले असते. उत्पादन व व्यापार वाढलेला असतो. रोजगार वाढलेला असतो. गतिशीलतेने व यंत्रसामग्रीत वाढ झालेली असते. तेजीच्या काळात ग्राहकांची वस्तूसाठी मागणी वाढलेली असते. ते भागविण्यासाठी किरकोळ व्यापारी घाऊक व्यापाऱ्याकडे मालाची मागणी करतात. त्याची पुर्तता करण्यासाठी उत्पादन साधन सामग्री बसवून उत्पादनाचे प्रमाण वाढवितात. त्यामुळे कामगारांची मागणी वाढते. परिणामी कामगारांचे वेतन वाढते, त्यांची खरेदी शक्ती वाढून वस्तु व सेवांसाठी आणखी मागणी येते. तेजी या परिस्थितीत किंमत वाढत असल्यामुळे नफ्याचे प्रमाण वाढते, परिणामतः पुन्हा किंमती, गुंतवणूक, रोजगार वाढत जातो. अशा तऱ्हेने अर्थव्यवस्था तेजीच्या शिखरावर जाऊन पोहचते.

पण नंतर तेजीला कारणीभूत ठरलेल्या घटकांचे सामर्थ्य हळुहळु कमी होऊ लागते. तेथून तेजीचा शेवट होण्यास सुरुवात होते. अर्थव्यवस्थेत अशा अवस्थांमध्येच घसरणीची बीजे पेरलेली असतात. संयोजकांचे अंदाज चुकु लागतात. कच्च्या मालाचा तुटवडा भासू लागतो. नफ्याऐवजी तोटा होण्याची संभावना निर्माण होते आणि मंदीतून आर्थिक घसरणीची अवस्था सुरु होते.

प्रा. हॅबर्लर यांच्या मते, तेजी म्हणजे अशी व्यवहार स्थिती की जिच्यात वास्तव उत्पन्न, उपभोग, वास्तव उत्पन्न निर्मिती आणि रोजगार पातळी उच्च राहते आणि जेथे उत्पन्न साधने पडून राहिलेली किंवा अपुरी वापरात नसतात. या अवस्थेची ठळक वैशिष्टये म्हणजे उत्पन्न व व्यापार उच्च पातळी, उच्च प्रभावी मागणी, उच्च रोजगार आणि उत्पन्न, उच्च भांडवलाची सीमांत कार्यक्षमता, व्यापार वाढ, वाढता व्याजदर, बँक पैशाचा विस्तार, व्यावसायिक आशावाद, अर्थव्यवस्था पूर्ण क्षमतेने कार्यरत, उच्च नफा मोठ्या प्रमाणात सट्टेबाजी व्यवहार, उच्च उत्पन्न खर्च इत्यादी.

पतनिर्मिती जर जास्त प्रमाणात झाली तर तेजीची अवस्था निर्माण होते. जोपर्यंत पतनिर्मितीत वाढ होत असते तोपर्यंत ही अवस्था टिकून राहते. पतनिर्मितीत वाढ होण्याचे कारण म्हणजे अधिकोषांनी अवलंबिलेले स्वस्त मुद्रा धोरण होय. संतुलनावस्थेला उपभोक्त्यांचा खर्च त्यांच्या उत्पन्नाबरोबर असतो. उपभोग आणि उत्पादन सारखे असते. उपभोक्ते आणि व्यापारी यांच्याजवळील रोख शिल्लकीत वाढ किंवा घट होत नाही. अधिकोषांच्या पतनिर्मितीत वाढ किंवा घट होत नाही, सुवर्णाच्या आयात निर्यातीत बदल घडून येत नाही.

तेजी ही संतुलनावस्था अनेक कारणांमुळे विचलीत होते सुवर्णाच्या आयातीमुळे सुवर्णाचा साठा वाढतो. त्यामुळे तेजीची अवस्था निर्माण होते. अधिकोष जी पत निर्मिती करतात, तिचा उपयोग उत्पादक घटकांना मोबदला देण्यासाठी केला जातो.

अर्थव्यवस्थेत व्यापाऱ्यांचा असा एक वर्ग असतो की, जो व्याजदरातील अल्पशा बदलांच्या बाबतीत सुध्दा जागरुक असतो, या वर्गाला व्याजदरातील बदलांचा लाभ मिळतो, म्हणजे व्याजदरातील बदलांचा नफ्यावर प्रभाव पडतो, जेव्हा व्याजदरात घट होते तेव्हा व्यापारी भांडवलाचा साठा वाढवितात ते उत्पादकांकडून जास्त प्रमाणात मागणी करतात. परिणामी वाढीव उत्पादनामुळे उपभोक्त्यांच्या उत्पन्नात व खर्चात वाढ होते. जेव्हा वस्तुंच्या मागणीत वाढ होते, तेव्हा व्यापाऱ्यांजवळील वस्तुंच्या साठ्यात घट होते, त्यामुळे ते पुन्हा उत्पादकांकडून वस्तूंची जास्त मागणी करतील. आर्थिक क्रियांमध्ये पुन्हा वाढ होते. अशारितीने वाढीव आर्थिक क्रिया म्हणजे वाढीव मागणी आणि वाढीव मागणी म्हणजे वाढीव आर्थिक क्रिया असे समीकरण तयार होते.

या अवस्थेत मागणी, उत्पादन, रोजगार व उत्पन्न हे उच्च पातळीवर असतात. उत्पादक वर्ग वस्तूंच्या किंमती वाढवितात, परंतु मजुरी, वेतन, व्याजदर, भाडे इत्यादीमध्ये होणारी वाढ ही किंमतीत होणाऱ्या वाढीच्या मानाने कमी असते. वस्तूंच्या किंमती या त्यांच्या उत्पादन व्ययापेक्षा जास्त असल्यामुळे लाभाचे प्रमाण वाढत जाते. लाभाचे प्रमाण व ते वाढत जाण्याची संभावना असल्यामुळे बाजारातील किंमतीत वेगाने वाढ होऊ लागते. अर्थव्यवस्थेतील उत्साहवर्धक वातावरणामुळे सर्व प्रतिभूती, बाँडस् यांच्या किंमतीही वाढतात. अपेक्षित लाभ वाढण्याची आशा असल्यामुळे गुंतवणुकीत आणखी वाढ होते. पतनिर्मितीच्या उदार धोरणामुळे गुंतवणुकीला आणखी प्रोत्साहन मिळते. यामुळे उपभोग्य वस्तुंकरिता मागणी आणखी वाढते व त्याचा परिणाम वस्तूंच्या किंमती आणखी वाढतात व आर्थिक क्रियांचा विस्तार होत जातो. किरकोळ व घाऊक विक्रेत्यांचाही उत्साह वाढतो. तसेच उत्पादकांचा उत्साह वाढून ते आपल्या भांडारात वृध्दी करत राहतात. अर्थव्यवस्थेतील हे उत्साहवर्धक व्यवहार भरभराटीच्या उच्च पातळीवर म्हणजे शिखरावर पोहचेपर्यंत चालू राहतात. ही तेजीची उच्च अवस्था होय.

तेजीच्या किंवा शिखर अवस्थेत पूर्ण रोजगारीची पातळी असते व किंमतीत स्फीतीकारी वृध्दी येऊ शकते. ही शिखर अवस्था समृध्दी अवस्थेचा अंत तसेच सुस्ती किंवा अपकर्ष अवस्थेची सुरुवातीचे लक्षण ठरते. या शिखर अवस्थेतच पतनाची किंवा अपकर्षाची बीजे रोवलेली असतात. यामुळे विस्ताराच्या मार्गावर नियंत्रण येते (i) उत्पादनाचा अतिविस्तार होत असल्यामुळे श्रम, कच्चा माल इत्यादी संसाधने तुलनेने दुर्मिळ बनतात, त्यामुळे उत्पादन व्यय वाढू लागतो; (ii) भांडवलाच्या दुर्मिळतेमुळे व्याजदर वाढतात व (iii) ज्याप्रमाणात समाजाच्या उत्पन्नात वाढ होते त्याप्रमाणात उपभोगात वाढ होत नाही, कारण उपभोग प्रवृत्ती ही एकापेक्षा कमी असते. या तीनमधील पहिल्या

कारकामुळे लाभसीमा घटते. दुसऱ्या घटकामुळे भांडवल महाग बनते. या दोन कारणांमुळे लाभाची अपेक्षा कमी होते. तिसऱ्या कारकावरुन कल्पना येते की उपभोग (मागणी) हा उत्पादनापेक्षा (पुरवठ्यापेक्षा) कमी पडत असल्यामुळे अत्युत्पादनाची परिस्थिती निर्माण होत आहे. यामुळे उद्यमी, साहसी, व्यापारी व व्यवसायीक अतिशय सावध होतात व या सर्वांच्या अतिआशावादाची जागा निराशावाद घेतो.

**२. घसरण (Recession) :**

घसरण किंवा अपसरण म्हणजे मंदीची सुरवात होय. घसरण म्हणजे आर्थिक विस्तार संपुष्टात येणे होय. बँका व्याजदर वाढवितात, रोखी बाजारात अस्थिरता निर्माण होते. किंमत वाढ थांबून हळुहळू किंमती कमी होणे ही सर्व आर्थिक मंदीची चिन्हे आहेत.

प्रारंभी शेअर बाजारात घसरण सुरु होते. आशावाद संपून निराशावाद निर्माण होतो, गुंतवणूक कमी होते. भांडवली वस्तुचे उत्पादन कमी होऊन बेकारी निर्माण होते. उत्पन्न कमी होऊन मागणी कमी होऊ लागते, पुन्हा गुंतवणूक कमी होते. लोक रोख स्वरुपात पैसे बाळगणे पसंत करतात त्यामुळे बँकांच्या ठेवी कमी होतात. परिणामतः पत पैसा कमी होतो. घसरणीची गती जंगलातील वणव्याप्रमाणे पसरु लागते. किरकोळ विक्रेत्यांची घाउक विक्रेत्यांकडील मागणी घटु लागते. परिणामतः घाउक विक्रेते असलेली अर्थव्यवस्था मंदीकडे वाटचाल करु लागते.

जेथे तेजी संपते तेथे घसारा सुरु होतो. तो परिवर्तन बिंदु असून अवस्था नाही. तिचे उल्लेखनिय वैशिष्टय म्हणजे अचानक रोजगारात घट, औद्योगिक उत्पन्न घट, वेतन दर घट, किंमत घट, पतपैशात घट, बँक निधीत वाढ, घटता उत्पादन खर्च, नफा अदृश्य, अल्प सट्टेबाजी, घटता व्यवसाय, घृणेची भावना निर्माण होते इत्यादी.

जेव्हा बँक पत पैशाची निर्मिती करीत नाही तेव्हा तेजीचा शेवट होतो. बँका अमर्यादीत प्रमाणात कर्ज देऊ शकत नाहीत, पत विस्ताराला मर्यादा पडतात. रोख रकमेच्या काही पटीतच पत निर्मिती केली जाते. बँकेच्या पत निर्मितीवरील मर्यादांचे परिणाम, काही कालावधीनंतर दिसून येतात. पत चलनवेग वाढल्यामुळे स्फीती अधिक तीव्र बनते. मजुरीच्या दरातील वाढ, पत, किंमती आणि नफ्यातील वाढीपेक्षा कमी असते. जेव्हा कर्त्या लोकसंख्येच्या रोख रकमेच्या मागणीत वाढ होते, तेव्हा कमी प्रमाणात बँक पत पैशाची निर्मिती करतात. बँक पत पैसा संकुचन करतात. व्यापारी कर्जाच्या परतफेडीसाठी कमी किंमतीला वस्तूची विक्री करतात. उत्पादकांना तोटा होतो. ते उत्पादक घटकांची मागणी कमी करतात. त्यामुळे उपभोक्त्यांच्या खर्चात घट होते. व्यापाऱ्यांच्या विक्रीत घट होते. तेजीची अवस्था संपुष्टात येऊन आर्थिक संकटाला प्रारंभ होतो.

तेजीवरुन जेव्हा उतरण सुरु होते तेव्हा सुस्ती किंवा अपसकर्षाला सुरुवात होते. खालच्या दिशेने प्रवास सुरु होतो. संकोच शक्तींचे विस्तार शक्तींवर वर्चस्व येऊ लागते. या घसरगुंडीला लागलेल्या परिस्थितीची बाह्य लक्षणे म्हणजे स्टॉक बाजारात अवसायन, बँक प्रणालीत तणाव, कर्जाचे काही प्रमाणात अवसायन व किंमतीत घट होण्यास सुरुवात इत्यादी असतात. लाभसीमा घटत जाते कारण उत्पादन व्यय हा किंमतीच्या मानाने वाढू लागतो.

नुकसान सहन करण्याचे सामर्थ्य नसलेल्या उत्पादन संस्था व्यवसाय बंद करतात. अस्तित्वात असलेल्या संस्था उत्पादन घटवितात व साठलेले उत्पादन विकण्याचा प्रयत्न करतात. गुंतवणूक, रोजगार, उत्पन्न व मागणी या सर्वात घट होत जाते व सतत घट होण्याची प्रक्रिया संचयी बनू लागते.

ही आर्थिक पतनाची प्रक्रिया वेगाने होऊ लागते तेव्हा परिस्थिती स्फोटक बनते. ही स्फोटक परिस्थिती बँकप्रणाली व स्टॉक एक्सचेंजमुळे निर्माण होते; व आतंकाची परिस्थिती (Crisis) निर्माण होते. त्यामुळे ठेवीदार आपल्या ठेवी बँकेतून वापस काढण्याची घाई करु लागतात. कोणतीतरी बँक किंवा निगम 'आपण कर्ज फेडण्यास असमर्थ आहोत' असे जाहीर करतात. यामुळे इतर संस्था व बँक यांची स्थिती अधिक वाईट होते. ठेवीदारांचा बँक व इतर संस्थांवरील विश्वास वेगाने घटू लागतो व आपल्या ठेवी बँकेतून काढण्याची घोडदौड सुरु होते. ही सुस्ती किंवा पतन एकदा सुरु झाले की जंगलातील वणव्याप्रमाणे वेगाने भडकत जाते व विध्वंसकारी क्षमतेला सतत उत्तेजन देत असते असे एम्. डब्लू. ली म्हणतात.

### ३. मंदी (Depression) :

घसरणीला लागलेली अर्थव्यवस्था वेगाने तळबिंदुकडे येते. घसरणीचा शेवट आर्थिक मंदीमध्ये होतो. मंदीमध्ये एकूण उपभोग उत्पादन आणि एकूण रोजगार कमी होऊन नफ्याचे प्रमाण संपुष्टात येते. बेरोजगार वाढतो, किंमती कमी व वेतन दरात घट होवून होऊन मागणी घटते. सर्वत्र निराशावाद पसरतो तथापि मंदीची अवस्था कायम टिकणारी नसते. मंदीचा काही कालखंड गेल्यावर वस्तुसाठी मागणी वाढू लागते. यंत्रासाठी मागणी वाढते गुंतवणूक वाढु लागते बँका ही उत्पादकाला कर्जे देऊ लागतात. अशाप्रकारे निरारशावाद संपवुन आशावादाचा प्रारंभ होऊन अर्थव्यवस्था पुनरुज्जीवनाकडे वाटचाल करु लागते.

अर्थव्यवस्थेची अशी स्थिती की जिच्यात वास्तव उत्पन्न उपभोग, वास्तव उत्पन्न निर्मिती, रोजगार दर घटत असतात. कारण उत्पन्न साधने व क्षमता पडून राहते, त्यास मंदी असे म्हणतात. या अवस्थेची ठळक वैशिष्टये म्हणजे उत्पन्न घट, व्यापार व व्यवहारात घट, एकुण उत्पन्न घट, व्याजदर घट, प्रभावी मागणीत घट भांडवलाची सीमांत कार्यक्षमता घटते, गुंतवणूक घट, पत पैसा पुरवठा घट, अल्प उत्पन्न-खर्च, अनेक व्यवसाय अपयश, अल्प व्यवसाय, इमारती बांधकाम बंद इत्यादी.

तेजी-प्रमाणेच मंदीची अवस्था सुध्दा समुच्चयात्मक स्वरुपाची आहे. प्रभावी मागणीतील बदलांमुळे मंदीची अवस्था अस्तित्वात येते. व्यापारी बँका दिलेले कर्ज परत मागतात. त्यामुळे व्यापारी व उत्पादकांना संकटाला तोंड द्यावे लागते. परिणामी उत्पन्नात घट होते. उपभोक्त्यांच्या उत्पन्नात घट होते. प्रभावी मागणीत घट होते. किंमतीत घट होते. बँकांजवळील रोख रक्कम वाढते. मुद्रेच्या चलनवेगात घट होते. ज्या घटकांमुळे तेजी निर्माण होते तेच घटक मंदीला कारणीभूत ठरतात तेजीच्या अवस्थेत घटक वरच्या दिशेने कार्य करीत असतात तर मंदीच्या अवस्थेत तेच घटक खालच्या दिशेने कार्यप्रवृत्त होतात. अर्थव्यवस्थेत जर बेकारी अस्तित्वात आली तर मजुरीत किंमतीच्या प्रमाणात बदल होत नाही. मजुरीच्या दरात किंमतीच्या तुलनेत कमी गतीने घट होते.

व्याजाचा दर कमी असूनही व्यापारीवर्ग कर्जाची मागणी करीत नाहीत. त्यांच्यावर निराशेची छाया असते.

जेव्हा आर्थिक क्रिया अतिशय मंद होतात तेव्हा सुस्ती मंदीत विलीन होते. वस्तू व सेवा यांचे उत्पादन रोजगार, उत्पन्न, मागणी व किंमत पातळी इत्यादीत घट होऊ लागते. बँकांच्या ठेवी व पतनिर्मिती कमी होते कारण व्यापारात अनुत्साहाचे वातावरण असल्यामुळे व्यापारी कर्ज घेऊन गुंतवणूक करण्यास तयार नसतात. प्रो. एस्टेच्या मते, सक्रिय क्रयशक्तीत घट होणे ही किंमतीत घट होण्याची पार्श्वभूमी आहे. यामुळे उत्पादनात मोठया प्रमाणावर घट होते. सामुहिक बेकारी, किंमती, लाभसीमा, मजुरी, व्याजदर, उपभोग, व्यय, गुंतवणूक, बँक ठेवी व कर्ज ही मंदीची बाह्य लक्षणे आहेत. यामुळे मंदीला सामर्थ्य प्राप्त होऊन ती वेगाने पसरु लागते. उद्योगधंद्यांना अवकळा येऊन त्यातील बरेसचे बंद पडतात. सर्व प्रकारच्या उत्पादनात मोठया प्रमाणात कमतरता येते. अर्थव्यवस्था ही पतनाच्या गर्तेत जाऊन पडते, अर्थव्यवस्था ही रसातळाला जाते.

ही मंदीची अवस्था अल्पकालीनही असू शकते. तसेच ही विशिष्ट पातळीपर्यंतच घटत जाईल; परंतु कधी-कधी सीमाकारी शक्तींना गती प्राप्त होते व त्यामुळे या मंदीच्या लाटेला आळा बसू शकतो व त्यातून पुढे अर्थव्यवस्थाही पुनरुत्थानाचा मार्ग आक्रमू लागते.

### ४. पुनरुज्जीवन (Recovery) :

भांडवली वस्तुची मागणी वाढल्याने पुनरुज्जीवनाला सुरुवात होते. त्यामुळे गुंतवणूक व रोजगार वाढीस लागतो. परिणामतः उत्पन्न पातळी वाढु लागते. उपभोग्य वस्तुंची मागणी वाढत जाते. पुन्हा भांडवली वस्तुची मागणी वाढत जाते. त्यामुळे पुन्हा रोजगार उत्पन्न किंमती नफा वाढतो. शेअर आणि रोखे बाजारात उत्साह पसरु लागतो. गुंतवणूकीला प्रोत्साहन मिळते. बँका नफा मिळविण्यासाठी कर्ज देण्यास तयार होतात. खरेदी पुनरुज्जीवन हळुहळू तेजी निर्माण होते.

हा खालचा स्थित्यंतर बिंदु असून त्यात अर्थव्यवस्था मंदीतून तेजीच्या अवस्थेत प्रवेश करते. तिची महत्वाची वैशिष्टये म्हणजे मंद रोजगार वाढ, मंद औद्योगिक उत्पन्न वाढ, मंद वेतन वाढ, मंद किंमतीत वाढ, बँक कर्जाचा विकास, निधीत मंद घट, उत्पन्न खर्च मंद वाढ, हळूहळू सट्टेबाजी वाढते, इमारत बांधकाम वाढू लागते इत्यादी.

वरीलप्रमाणे पुन्हा घसरणीनंतर मंदी व मंदीतुन पुन्हा पुनरुज्जीवन व पुनरुज्जीवनातुन तेजी अशाप्रकारे अर्थव्यवस्थेत चक्राकार बदल घडून येतात. व्यापार चक्राच्या चारही अवस्थांचा कालखंड सारखाच असतो.

पुनरुज्जीवन अवस्थेत अर्थव्यवस्था मंदीकडून तेजीकडे वळण घेत असते. अधिकोषाजवळील रोख रक्कमेत वाढ झाल्यामुळे व्याजदरात घट झालेली असते. व्यापारी बँक कर्जाची मागणी वाढावी म्हणून प्रयत्न करतात ते व्याजदरात घट करतात. व्यापारी बँक कर्जाची मागणी वाढावी म्हणून प्रयत्न करतात ते व्याजदरात घट करतात. परिणामी व्यापारी वर्ग कर्जाची मागणी करतो. बँकांच्या पतनिर्मितीत वाढ होते. उत्पादकांच्या उत्पन्नात वाढ होते. उत्पादक घटकांची मागणी वाढते. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होते. प्रभावी मागणीत वाढ होते.

व्यापाऱ्यांची वस्तुचा साठा करण्यासाठी मागणी वाढते. म्हणून उत्पादित वस्तूच्या मागणीत वाढ होते. उत्पादक उत्पादनात वाढ करतात आणि जास्त प्रमाणात उपभोक्त्यांना मुद्रेचे हस्तांतरण करतात. उपभोक्ते त्यांना मिळणाऱ्या मुद्रेचा उपयोग वस्तुच्या खरेदीसाठी करतात त्यामुळे व्यापाऱ्याजवळील साठयात घट होते. ते साठा वाढविण्यासाठी

वस्तुंची मागणी वाढवितात. अशा रितीने जेव्हा व्यापारी आपल्या वस्तुचा साठा वाढविण्यासाठी कर्ज घेतात तेव्हा प्रत्येक वेळी उपभोक्त्यांच्या क्रयशक्तीत वाढ होते.

समजा अर्ध टिकाऊ वस्तू झिजते व त्यामुळेच अर्थव्यवस्थेत त्या वस्तूऐवजी दुसरी वस्तू वापरात आणावी लागते. त्यामुळे मागणी वाढते. ही मागणी पूर्ण करण्याकरिता गुंतवणूक व रोजगार यामध्ये वाढ होते. अशा प्रकारे उद्योगाच्या पुनरुत्थानाला सुरुवात होते. संबंधीत भांडवली उद्योगातही पुनरुत्थानाला सुरुवात होते. पुनरुत्थानाच्या क्रियेला सुरुवात झाल्यानंतर तीच क्रिया पुढे संचयी (Cumulative) बनते. याचा परिणाम होऊन अर्थव्यवस्थेत रोजगार, उत्पन्न व उत्पादन यांची पातळी क्रमशः वाढू लागते. पुनरुत्थानाच्या सुरवातीच्या काळात अर्थव्यवस्थेत आतिरिक्त क्षमता (Excess Capacity) अस्तित्वात असते. यामुळे एकूण व्ययात कोणत्याही प्रकाराची वाढ न होता उत्पादनात वाढ होते. परंतु बदलत्या काळानुसार उत्पादन कमी लवचिक होते. वाढत जाणाऱ्या उत्पादित व्ययामुळे अडथळे निर्माण होतात. वितरणात अडचणी निर्माण होतात व आवश्यकता पडल्यास सयंत्राचा (Plant) विस्तार करावा लागतो. या सर्व कारणांमुळे किंमती वाढू लागतात. त्यामुळे नफा वाढू लागतो. व्यापार जगतात उत्साहाचे वारे वाहू लागते. त्यामुळे गुंतवणुकीला उत्तेजन मिळते. त्यामुळे बँकातून मिळणाऱ्या कर्जाची मागणी वाढते. परिणामतः पतनिर्मितीत पतविस्तार होतो. थोडक्यात, गुंतवणूक, रोजगार, उत्पादन, उत्पन्न व किंमतीत वाढ ह्यांची संचयी प्रक्रिया हि स्वतःच स्वतःला पोषक बनते, आत्मसमर्थक बनते व शेवटी पुनरुत्थान अवस्थाही समृध्दी किंवा उत्कर्ष अवस्थेत शिरते.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :**

**रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पुर्ण करा.**

१. व्यापार चक्रांचा शास्त्रशुध्द अभ्यास प्रथमतः ..................याने केला
(अ) क्लेमेद व जुग्लर (ब) मिचेल व हॉट्रे (क) हायके व रॉबर्टसन (ड) वरील पैकी नाही

२. व्यापार चक्राची वैशिष्टये .......................... आहेत.
(अ) निश्चित कालावधी (ब) सर्वसमावेशक घटना
(क) संचयी स्वरुप (ड) वरील पैकी सर्व

३. खालीलपैकी ............................ हा व्यापार चक्राचा प्रकार आहेत.
(अ) अल्प 'किचीन' चक्र (ब) दीर्घजुग्लर चक्र
(क) कुझनेट्स चक्र (ड) वरील पैकी सर्व

४. खालील पैकी ............................ कोणती व्यापार चक्राची अवस्था आहे.
(अ) तेजी (ब) घसरण (क) मंदी (ड) वरील पैकी सर्व

५. .......................... यांच्यामते 'एकूण आर्थिक व्यवहारातील चढ-उतारांना व्यापार चक्रे असे म्हणतात.'
(अ) हॉट्रे (ब) रॉबर्टसन (क) जुग्लर (ड) मिचेल

## ४.२.२ व्यापार चक्राचे सिध्दांत (Theories of Trade Cycle) :

### हॅाट्रेचा व्यापार चक्राचा सिध्दांत (Hawtrey's Theory of Trade Cycle) :

**प्रस्तावना :**

व्यापारचक्रे अस्तित्वात येण्याची अनेक कारणे दिलेली आहेत. काहींच्या मते अतिगुंतवणुकीमुळे व्यापारचक्रे अस्तित्वात येतात. तर काहींच्यामते नवप्रवर्तनामुळे व्यापारचक्रे निर्माण होतात. तर काहींच्यामते न्यून उपभोगामुळे व्यापारचक्रे निर्माण होतात. तर हॅाट्रेच्या मते मुद्रा परिणामातील बदलामुळे व्यापारचक्रे निर्माण होतात.

हॅाट्रे यांच्यामते मुद्रा परिणामातील बदल हे व्यापारचक्राचे एकमेव व पुरेसे कारण होय. मुद्रा परिणाम आणि उपभोक्त्याच्या एकूण खर्च समान असतो. परिणामातील वाढीमुळे अर्थव्यवस्थेतील मुद्रस्फीती निर्माण होते. तर मुद्रा परिणामातील घटींमुळे अर्थव्यवस्थेत मंदी येते. उपभोक्त्यांच्या खर्चात केवळ वाढ होते तेव्हा व्यापारात तेजी येते. उत्पादन वाढते आणि किंमती वाढतात. जेव्हा मुद्रेच्या प्रवाहात घट होते तेव्हा व्यापारात मंदी येते. उत्पादन घटते आणि किंमतीत घट होते. हॅाद्रे यांच्यामते ''मुद्रेचा चलनवेग म्हणजे उपभोक्त्याच्या खर्चाचे मुद्रा परिमाणातील असलेले प्रमाण होय.''

हॅाट्रे यांच्या मते, मुद्रा परिमाणातील बदलामुळे अर्थव्यवस्थेत चक्रीय उच्चाटणे घडून येतात. मुद्रा स्फितीच्या काळात जनतेच्या हातात अधिक क्रयशक्ती येते. क्रयशक्तीत वाढ झाली तर वस्तुची मागणी वाढते वस्तूच्या किंमती वाढतात. उत्पादनात व रोजगारात वाढ होते. याउलट मुद्रा संकोच घडून आलातर जनतेच्या हातातील क्रयशक्तीत घट होते आणि क्रयशक्तीत घट झालीतर वस्तुंच्या मागणीत घट होते वस्तुच्या किंमती कमी होतात. उत्पादनात घट होते बेकारी वाढते.

हॅाट्रे यांनी आपल्या सिध्दांतात बँकिंग पध्दतीला अवास्तव महत्व दिले आहे. व्यापारी बँका अनेक कार्ये पार पाडतात त्यापैकी सर्वात महत्वाचे कार्य पतनिर्मिती आहे.

हॅाट्रे यांच्या मते, मुद्रा परिमाणातील बदलांमुळे अर्थव्यवस्थेत चक्रिय उच्चावचेन घडून येतात. मुद्रा स्फीतीच्या काळात जनतेच्या हातात अधिक क्रयशक्ती येते. क्रयशक्तीत वाढ झाली तर वस्तूंची मागणी वाढते. वस्तुंच्या किंमती वाढतात. उत्पादनात व रोजगारात वाढ होते. उत्पादक घटकांच्या किंमती म्हणजे त्यांचा मोबदला वाढतो. मुद्रा संकोच घडून आला तर, जनतेच्या हातातील क्रयशक्तीत घट होते आणि क्रयशक्तीत घट झाली तर वस्तूंच्या मागणीत घट होते. वस्तुंच्या किंमती कमी होतात. उत्पादनात घट होते. बेकारी वाढते. उत्पादक घटकांच्या किंमती म्हणजे त्यांचा मोबदला कमी होतो. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात घट होते.

**सिध्दांताची गृहिते** (Assumptions of the Theory) **:**

१. मुद्रेचा पुरवठा लवचिक असतो.

२. बँकिंग प्रणालीचे अर्थव्यवस्थेत महत्वाचे स्थान असते.

३. समाजाचे विभाजन उपभोक्ते आणि उत्पादक अशा दोन गटात झालेले असते

४. मुद्रेची मागणी आणि मुद्रेचा पुरवठा ही अर्थव्यवस्थेतील संतुलनाची अवस्था होय.

५. व्यापारी वर्गाचे समाजात महत्त्वपूर्ण स्थान असते, हा वर्ग त्याच दरातील बदलानुसार वस्तुंच्या पुरवठ्यात वाढ किंवा घट करित असतो.

६. मंदी निर्माण होण्याचे कारण म्हणजे उत्पादन रचनेतील घट होय.

७. उत्पादन रचनेत घट होण्याचे कारण म्हणजे सक्तीची बचत होय.

८. उत्पादन प्रक्रियेचा विस्तार ऐच्छिक बचतीमुळे होतो.

९. उपभोग्य वस्तूंच्या मागणीतील वाढीमुळे उत्पादन प्रक्रियेत घट होते आणि त्यामुळे मंदी अस्तित्वात येते.

१०.उत्पादन प्रक्रियेचा कालावधी सक्तीच्या बचतीमुळे नेहमीसाठी वाढू शकत नाही.

११. बचतीपेक्षा जास्त खर्च झाल्यामुळे सार्वजनिक खर्चात वाढ होते. यामुळे उत्पादन प्रक्रिया कमी कालावधीची बनते आणि मंदी अस्तित्वात येते.

१२. मुद्रेच्या पुरवठ्यात जर बदल झाला तर उत्पादन प्रक्रियेचा कालावधी कमी होतो.

**हॉट्रेच्या मते व्यापारचक्र म्हणजे काय?**

सामान्यपणे मंदी ही अमौद्रीक घटकांमुळे अत्सित्वात येत नाही. अमौद्रीक घटकात भूकंप, युध्द, संप, पिकांची नासाडी सामान्य दुर्भिक्ष्य इत्यादींचा समावेश होतो. याशिवाय पिकातील बदल व विशिष्ट उपयोगातील अति गुंतवणूकीमुळे त्या उद्योगाच्या बाबतीत आंशिक मंदी येऊ शकते. परंतु चक्रीय स्वरुपातील सामान्य मंदी अमौद्रीक घटकांमुळे येते असे प्रा. हॉट्रे यांचे मत आहे. हॉट्रे यांचा व्यापार चक्राचा सिध्दांत सुवर्णमान पध्दतीशी निगडीत होता. सुवर्णमान पध्दतीत मुद्रा परिमाण लवचिक होते, मुद्रा परिमाणात वाढ किंवा घट करणे सुलभ होते. पहिल्या महायुध्दानंतर सुवर्णमान पध्दतीचा त्याग करण्यात आला त्यामुळे मुद्रा पुरवण्याची लवचिकता कमी झाली.

हॉट्रे यांच्या मते, ''मुद्रेचा चलन वेग म्हणजे उपभोक्त्यांच्या खर्चाचे मुद्रा परिमाणाशी असलेले प्रमाण होय.''

''हॉट्रे यांच्या मते, व्यापार चक्र ही शुध्द मौद्रिक घटना आहे.''

According to Hawtrey, "Trade cycle is purele, monetary phenomenon."

**हॉट्रेच्यामते, ''व्यापार चक्र म्हणजे मुद्रास्फिती आणि अपस्फितीचीही लहान प्रतिक्रिया होय.''**

"Trade cycle is nothing but a small replica of an outright money inflation and deflation."

''व्यापार चक्र ही शुध्द मौद्रीक घटना होय. कारण सामान्य मागणी ही मौलिक घटना असते.'' प्रा. आर. व्ही हॅट्रे यांनी १९७६ मध्ये व्यापार चक्र सिध्दांत मांडला त्या सिध्दांताला शुध्द चलन विषयक सिध्दांत असे म्हणतात.

हॅाट्रेच्या मते व्यापार चक्र ही सर्वस्वी चलन विषयक घटना आहे. कारण एकूण मागणी ही मुळातच एक चलनजन्य घटना आहे. व्यापार चक्र निर्माण होण्यास पैसा हाच घटक कारणीभूत आहे. पैशाच्या पुरवठयावर प्रभाव पाडणारा महत्वाचा घटक म्हणजे पतपैसा होय. व्यापारी बँकांनी व्याजाच्या दरात बदल केल्यास पत पैशाच्या संख्येत बदल होतो आणि त्यामुळे एकूण प्राप्ती व एकूण खर्च औद्योगिक उलाढाली इत्यादींमध्ये सक्रिय बदल घडून येतात.

अर्थव्यवस्थेत व्यापारी वर्ग महत्वपूर्ण कार्य करतो. व्याजाच्या दरातील बदलाचा व्यापारी उलाढालीवर परिणाम होतो. पुरवठयात बदल घडवून आणण्यात पत पैशांची भूमिका महत्वाची असते. युध्द, भूकंप, संप, पुर यासारख्या अन्य कारणांनी अर्थव्यवस्थेत तात्पुरती मंदी निर्माण होते. पण हॉट्रे यांच्या मते त्याला व्यापार चक्र म्हणता येणार नाही.

थोडक्यात, पैशातील पुरवठयातील बदलामुळे व्यापार चक्राची निर्मिती होते. हॅाट्रेच्यामते अर्थव्यवस्थेत समतोल असताना एकूण उत्पन्न व एकुण खर्च समान होतात आणि भांडवलाची सीमांत कार्यक्षमता समान असते. पण बँकांनी पत पैशाच्या पुरवठयात बदल केला की, समतोल नष्ट होऊन व्यापार चक्राची निर्मिती होते. हॅाट्रेच्या विचारांनुसार चलनवाढ म्हणजे तेजी आणि चलनघट म्हणजे मंदी.

### I. तेजी (Boom) :

व्यापरी बँकांनी मोठ्याप्रमाणात पत पैशाची निर्मिती केल्यास व्यापारी व उद्योगपती अधिक कर्ज घेण्यास प्रवृत्त होतात. व्यापारी कर्ज घेऊन मालाची साठेबाजी करतात. वस्तुची कृत्रिम टंचाई निर्माण करुन नफा मिळवितात. एकुण चलनवाढ झाल्याने या काळात किंमती वाढतात व्यापारीवर्ग उत्पादकाकडे मालाची मागणी करतात. त्यामुळे वस्तूच्या किंमती वाढून वेतनदर वाढतात, ते पुर्वीपेक्षा अधिक खर्च करीत असल्याने एकुण मागणी वाढते ही मागणी पुर्ण करण्यासाठी उत्पादनाच्या नवीन योजना आखतात, तेजीच्या काळात व्यापारी बँका कमी व्याजदराने अधिक कर्ज देण्यास उत्सुक असतात. बँकांच्या कर्ज व्यवहारातून पत पैशाची निर्मिती वाढते. किंमत वाढत असल्याने पैशाचे मुल्य घटते. अर्थव्यवस्थेतील खरेदी-विक्रीचे व्यवहार वाढल्याने पैशाचा भ्रमण वेग वाढतो अशा रितीने बँकांनी कमी व्याजदराने कर्ज पुरवठा करुन पत निर्मिती वाढल्याने उत्पादन रोजगार उत्पन्न व मागणी वाढत जाऊन तेजीची अवस्था प्राप्त होते. एका व्यवसायातील तेजी अन्य व्यवसायात पसरते. शेतमालाच्या किंमती वाढतात. कच्च्या मालाच्या किंमती वाढतात. खंडाचे दर वाढतात, वेतनदर वाढतात, उत्पादन वाढल्याने रोजगार वाढतो. किंमती वाढल्याने व्यापारी वर्गाचा नफा वाढतो. अतिरेकी आशावादामुळे ते अधिक कर्जे घेऊन गुंतवणूक वाढवितात, शेअर्सच्या किंमती वाढतात, सर्वांच्या दृष्टीने हा भरभराटीचा कालखंड असतो.

### II. घसरण (Recession) :

व्यापारी बँकांनी कर्जे देण्याचे कमी केल्याने पत पैशाच्या विस्तारावर मर्यादा येऊन तेजी संपुष्टात येते. तेजीच्या काळात बँकानी अधिकाधिक कर्ज देऊन पतपैशाची निर्मिती केलेली असते. त्यामुळे त्यांच्याकडील रोखतेचे प्रमाण कमी झालेले असते. बँकांना रोखता तत्वाचे पालन करणे कठीण जाते. मध्यवर्ती बँकां श्रेणी नियंत्रणासाठी पत नियंत्रणाच्या साहायांचा वापर करते, त्यामुळे व्यापारी बँका कर्जे देण्याचे प्रमाण कमी करतात. व्याजाचे दर वाढविण्यात

अशा स्थितीत पुर्वीच्या कर्जाची परतफेड करण्यासाठी साठेबाज व्यापारी विक्रीस काढतात. त्यामुळे वस्तूचा एकूण पुरवठा वाढतो. अर्थव्यवस्थेतील पैशाचे प्रमाण कमी होते. त्यामुळे मागणी घटते अशा स्थितीत किंमती कमी होतात. उद्योग व्यापारी वर्गाचा नफा कमी होतो ते गुंतवणूक कमी करतात. काही वस्तुंचे उत्पादन कमी करतात तर काही  वस्तुंचे उत्पादन बंद करतात त्यामुळे बेकारी वाढु लागते. उत्पादन घटकांची मागणी  कमी होवून त्याचे उत्पन्न घटते, पैशाचे मुल्य वाढत असल्याने रोकड पसंती वाढत जाते. बँकांजवळील ठेवींचे प्रमाण कमी होवून त्यांची कर्जे देण्याची व पत निर्मिती करण्याची क्षमता कमी होते. लोकांचा खर्च कमी होऊन वस्तू व सेवांची मागणी घटते. किंमती घसरण्यास सुरवात होऊन अर्थव्यवस्था तेजीकडून मंदीकडे जाते.

### III. मंदी (Depression) :

घसरणीच्या अवस्थेतुन अर्थव्यवस्थेत मंदी निर्माण होते. परिणामकारक मागणी घटते. त्यामुळे किंमती घटतात नफ्याचे प्रमाण कमी होते. उद्योगधंदे मंद पडतात. नफ्याचे प्रमाण कमी होते. रोजगार कमी होऊन लोकांचे उत्पन्न कमी होते. बेकारी वाढते. अर्थव्यवस्था मंदीच्या तडाख्यात सापडते.

व्यापारी बँकांच्या पत पुरवठयाच्या संकोच्यामुळे किंमत घटण्याची प्रक्रिया सुरू होते. व्यापारी वर्ग पूर्वीची मागणी रद्द करतात, उत्पादन कमी करतात. उत्पादक घटकांची बेकारी वाढते. मजुरांना कामावरुन कमी केले जाते. त्याचे उत्पन्न घटते. कच्च्या मालाला मागणी नसल्याने त्यांच्या किंमती उतरतात. कच्च्या मालाचा पुरवठा करणाऱ्यांचे नुकसान होते. वस्तुंची मागणी कमी होऊन किंमती अधिक वेगाने घटतात. व्यापारी वर्गास तोटा होतो. बँकांनी पुर्वी दिलेली कर्जे वसूल होण्यात अडचणी आल्याने काही बँकांचे दिवाळे निघते. शेअर्सच्या किंमती कमी होऊन भांडवल बाजारावर अनिष्ट परिणाम होतो. संपुर्ण अर्थव्यवस्थेत निराशेचे वातावरण पसरते. भांडवली वस्तू उत्पादकांचे व शेतकरी वर्गाचे नुकसान होते. मागणीचे प्रमाण कमी होऊन मंदीची लाट येते व सापेक्षेने मंदी दिर्घकाळ टिकून राहते.

### IV. पुनरुज्जीवन (Recovery) :

मंदीच्या काळात बँकांची कर्जे भागविण्यासाठी व्यापारी वर्ग येईल त्या किंमतीला माल विकण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील पैसा बँकांकडे जमा होतो. बँकांजवळील रोकड वाढत जाते. त्यामुळे त्यांची पत निर्मितीची क्षमता वाढते. अशावेळी उद्योग व्यावसायिक लोकांनी अधिक कर्जे घ्यावीत म्हणून बँका व्याजदर कमी करतात. त्यामुळे व्यापारी कर्जे घेण्यास प्रवृत्त होतात. उत्पादन घटकांना काम मिळून बेकारी कमी होते. उत्पादन घटकांची प्राप्ती वाढते. उपभोक्ते व व्यावसायिक आपल्या जवळील रोख रक्कम बँकेत ठेवतात. प्राथमिक ठेवीत वाढ झाल्याने बँकांची कर्ज देण्याची क्षमता वाढते. बँका अधिकाधिक कर्ज पुरवठा करुन पत पैशाची निर्मिती करतात. त्यामुळे चलन विस्तार होऊन अर्थव्यवस्थेत पुनरुज्जीवनाची अवस्था निर्माण होते.

हॉट्रे यांनी व्यापार चक्राचे स्पष्टिकरण करताना पतकोंडीची स्थिती निर्माण होण्याची शक्यता प्रतिपादन केली आहे. काही वेळा व्याजाचे दर कितीही कमी झाले तरी कर्जाकरीता मागणी वाढणे अशक्य असते या परिस्थितीला पतकोंडी म्हणतात. मंदीच्या काळात वस्तूच्या किंमती घटत असतात मागणीत मोठया प्रमाणात घट होते अशा स्थितीत व्याजाचे दर कितीही कमी झाले तरी व्यापारी व उद्योगपती कर्जे घेण्यास तयार होत नाहीत. हॉट्रेयांच्या मते,

कमी व्याजदराचे धोरण काहीवेळा अयशस्वी झाल्यासारखे वाटले तरी स्वस्त पैशाचे धोरण हे अर्थव्यवस्थेत पुनरुज्जीवन निर्माण करण्यास उपयुक्त ठरते.

**टिका (Criticism) :**

प्रा. हॉट्रे यांचा व्यापार चक्राविषयीचा सिध्दांत तर्कशुध्द असलातरी त्यावर पुढीलप्रमाणे टिका केली आहे -

**१. चलनजन्य घटकांना अवास्तव महत्व :** व्यापार चक्र ही सर्वस्वी चलनजन्य घटना आहे. हे हॉट्रेचे विधान एकांगी आहे. व्यापार चक्राची निर्मिती चलनजन्य तसेच अचलनजन्य घटकांमुळे होत असते. उदा.- नैसर्गिक घटक, नवप्रर्वतन, उपभोग न्यूनता, हवामानातील बदल इत्यादी अचलनजन्य घटक ही व्यापार चक्रांच्या निर्मितीस कारणीभूत ठरतात. याकडे हॉट्रेने दुर्लक्ष केले आहे. म्हणजेच या सिध्दांतात चलनजन्य घटकांना अवास्तव महत्व दिल्याने तो संकुचित स्वरुपाचा ठरतो.

**२. व्यापारी व्यवहारावर अवास्तव भर :** हॉट्रे यांनी आपल्या सिध्दांतात व्यापारी वर्गाला अवास्तव महत्व दिले आहे. व्यापारी वस्तुचे साठे करण्यासाठी बँकांकडून कर्ज घेतात त्यामधुन पत विस्तार होऊन तेजीची अवस्था निर्माण होते. याउलट मंदीच्या काळात घटते  व त्यामागुन तेजी-मंदी निर्माण होते. ही वस्तूस्थितीला धरुन नाही. वास्तविक व्यापारापेक्षा भांडवली वस्तुंच्या उत्पादनातील स्थित्यंतरे अधिक महत्वाची असतात. याकडे त्याने दुर्लक्ष केले आहे.

**३. कर्ज व व्याजदाराचा संबंध अयोग्य :** व्यापारी बँकांकडून कर्ज घेऊनच मालाचे साठे करतात असे आढळले नाही. व्याजदर कमी झाले की साठेबाजी वाढते व व्याजदरात वाढ झाली की, साठेबाजी कमी होते हे पटण्यासारखे नाही. कर्ज घेण्याचे निर्णय हे व्याजदरावर अवलंबून नसतात तर ते भविष्यकालिन फायद्यावर अवलंबुन असतात. याकडे सिद्धांतात दुर्लक्ष केले आहे.

**४. बँकांच्या पत निर्मितीला महत्त्व :** हॉट्रे यांनी व्यापारी बँकांच्या पत निर्मितीच्या कार्याला अवास्तव महत्व दिले आहे. आर्थिक उलाढालीत पतपैसा महत्वाची भूमिका पार पाडत असला तरी अर्थव्यवस्थेतील चढ उतारात तो अग्रस्थानी असतो असे म्हणता येणार नाही. कारण मंदीच्या काळात व्याजाचे दर कितीही कमी केले तरी अर्थव्यवस्था मंदीतून बाहेर काढता येत नाही. बँकांच्या पतनिर्मिती इतकेच अन्य सहकारी महत्वाचे असतात.

**५. परिणामाला कारण बनविले :** हॉट्रे यांच्यामते पत विस्तार व पत संकोच झाल्यामुळे व्यापारचक्र निर्माण होतात. परंतू प्रत्यक्षात असे आढळते की, तेजीमुळे मागणी निर्माण होऊन पतविस्तार घडून येतो. म्हणजे पतविस्तार हा तेजीचा परिणाम ठरतो. याचा अर्थ हॉट्रेने परिणामालाच कारण म्हटले आहे.

व्याजदरातील वाढीमुळे अर्थव्यवस्थेला कलाटणी मिळून अर्थव्यवस्था तेजीकडून मंदीकडे जाते. असे हॉट्रेचे म्हणणे आहे. प्रत्यक्षात व्याजदारातील बदल हे व्यापार चक्राचे कारण नसून परिणाम आहे. आर्थिक आरिष्ट उद्‌भवल्यानंतर व्याजदरात वाढ होते.

**६. दिर्घकालीन व्याजदाराचा विचार नाही :** हॉट्रेने व्यापार चक्राच्या सिध्दांतात अल्पकालिन व्याजदाराचा विचार केलेला आहे, परंतू दिर्घकालीन व्याजदराचा विचार केलेला नाही आणि तोच अधिक महत्वाचा आहे.

**७. गौण व्यापार चक्राचे स्पष्टीकरण :** हॉट्रेचे व्यापार चक्राचे स्पष्टीकरण हे एक तर गौण व्यापार चक्रांना लागु ठरेल परंतु प्रमुख व्यापार चक्राचे स्पष्टीकरण मिळत नाही. काही व्यापार चक्रे ही जागतिक स्वरुपाचीही असतात अशा स्थितीला एखाद्या देशातील व्यापारी बँकेने पतनिर्मिती वाढविल्यामुळे व्यापार चक्राची निर्मिती होते ते विधान पटण्यासारखे नाही.

**८. विकसनशील देशांना गैर लागू :** विकसनशील देशात व्यापारी बँकांचा विकास झालेला नसतो त्यामुळे अशा देशांत पत पैशाऐवजी रोख पैशाचा (विधिग्राह्य) अधिक वापर केला जातो. त्यामुळे अशा देशात व्यापारी बॅकांच्या पत निर्मितीच्या बदलामुळे व्यापार चक्र निर्माण होते, हे म्हणणे अयोग्य ठरते अशा देशात हवामानातील नैसर्गिक घटक व्यापार चक्राच्या निर्मितीस कारणीभूत ठरतात, म्हणजे अविकसित देशात हॅाट्रेचा सिध्दांत गैर लागू पडतो.

### सिद्धांताचे महत्त्व (Importance of Theory) :

हॅाट्रे यांनी व्यापार चक्राचा शुध्द सिध्दांत प्रतिपादन केला या सिध्दांताचे महत्वाचे योगदान म्हणजे हॅाट्रे यांनी व्यापार चक्रासाठी केलेला उत्पन्न उपयोग होय.

या सिध्दांताने व्यापार विश्लेषणात मोलाची भर घातली, धोरणांचे उद्दीष्ट म्हणजे उपभोक्त्यांचा खर्च स्थिर ठेवणे होय. यात नवीन गुंतवणुकीचा सुध्दा समावेश होतो. आपण असे म्हणू शकतो की, आर्थिक धोरणाचे उद्दीष्ट केवळ वस्तुच्या किंमतीची पातळी स्थिर ठेवणे नसुन उत्पादीत घटकांची किंमतीची पातळी स्थिर ठेवणे असते. या सिध्दांतातून व्यापार चक्राचे तेजी व मंदी अवस्थांच्या समुच्यात्मक स्वरुपाचे केलेले प्रदर्शन आणि विश्लेषण स्पष्ट होय.

हॅाट्रे यांच्या सिध्दांताचा आधार नंतरच्या अनेक अर्थशास्त्रज्ञांनी अमौद्रीक सिध्दांताची मांडणी करण्यासाठी घेतली उदा.- केन्स हॅाट्रे यांनी आपल्या सिध्दांतात व्यापाऱ्यांच्या संग्रहाचा जो विचार मांडला तो आधूनिक काळातील संग्रहण चक्र विश्लेषणाचा एक महत्वपुर्ण घटक मांडला जातो असे मत प्रा. हॅन्सन यांनी व्यक्त केले.

### प्रा. हायेक यांचा व्यापार चक्राचा सिध्दांत (Hayek's Theory of Trade Cycle) :

**प्रास्ताविक :**

प्रा. एफ. ए. हायेक हे ऑस्ट्रीयन संप्रदायातील अर्थशास्त्रज्ञ, त्यांनी व्यापार चक्राबाबतचा स्वतंत्र असा चलनजन्य सिध्दांत मांडला आहे. त्यांच्यामते 'भांडवली वस्तुंच्या उत्पादनात स्थित्यंतरे झाल्याने व्यापार चक्राची निर्मिती होते.' भांडवली वस्तुंच्या उत्पादनात बदल घडवून आणण्यात व्यापारी बँकांचे कर्जविषयक धोरण अग्रभागी असते. व्यापारी बँका कमी व्याजदराने मोठया प्रमाणात कर्जपुरवठा करीत असल्याने भांडवली वस्तुंच्या क्षेत्रात अतिरिक्त गुंतवणूक होऊन व्यापार चक्रीय स्थित्यंतरे घडून येतात. म्हणूनच या सिध्दांताला चलनजन्य अतिरिक्त गुंतवणूक सिध्दांत असे म्हणतात. अर्थव्यवस्थेच्या योग्य विकासाकरीता अर्थव्यवस्थेतील विभिन्न क्षेत्रांचा समतोल महत्वाचा असतो. यावर सिध्दांतात भर देण्यात आला आहे. व्यापारचक्र विश्लेषणात खर्च-किंमत संबंधातील समन्वय महत्वाचा ठरतो हे सिध्दांतात सांगितले आहे. तेजीच्या अवस्थेत पत विस्तार झाला तर त्यामुळे उत्पादन रचनेत विसंगती निर्माण होते. याचे स्पष्टीकरण हायेक यांनी केले. विसंगती निर्माण झाली तर तेजीची अवस्था संपुष्टात येते याचे विवेचन केले आहे.

**सिद्धांताची गृहीतके (Assumptions of the Theory) :**

प्रा. हायेक यांच्या व्यापार चक्र सिद्धांताची गृहितके खालीलप्रमाणे आहेत.

१. उत्पादनाची रचना समतोल स्थितीत असताना नैसर्गिक व्याजाचा दर आणि बाजारातील व्याजाचा दर समान असतो.

२. उत्पादनाचे उपभोग खर्च व बचत या दोन भागात विभाजन झालेले असते. उपभोग खर्चासाठी उत्पन्नाचा जो हिस्सा वापरला जात नाही ती बचत होय. बचत ही व्याज दरावर अवलंबून असते.

३. नैसर्गिक व्याज दरामुळे बचत व गुंतवणुकीत समतोल प्रस्थापित झालेला असतो.

४. समाजाच्या उपभोग खर्चा इतके उपभोग्य वस्तुंचे उत्पादन होत असून बचत अथवा गुंतवणूक खर्चाइतके भांडवली वस्तुंचे उत्पादन होत असते.

५. अर्थव्यवस्थेत पुर्ण रोजगाराची स्थिती असते.

६. बँकांचे पतविषयक धोरण लवचिक असते.

७. भांडवली वस्तुंच्या निर्मितीसाठी अतिरिक्त गुंतवणूक झाल्यास मंदीची परिस्थिती निर्माण होते.

८. मंदी निर्माण होण्याचे कारण म्हणजे उत्पादन रचनेतील घट होय.

९. उत्पादन रचनेत घट होण्याचे कारण म्हणजे सक्तीची बचत होय.

१०. उत्पादन प्रक्रियेचा विस्तार ऐच्छिक बचतीमुळे होतो.

११. उपभोग्य वस्तूंच्या मागणीतील वाढीमूळे उत्पादन प्रक्रियेत घट होते आणि त्यामुळे मंदी अस्तित्वात येते.

१२. बचतीपेक्षा जास्त खर्च झाल्यामुळे सार्वजनिक खर्चात वाढ होते. यामुळे उत्पादन प्रक्रिया कमी कालावधीची बनते आणि यामुळे मंदी अस्तित्वात येते.

१३. पैशाच्या पुरवठयात जर बदल झाला तर उत्पादन प्रक्रियेचा कालावधी कमी होतो.

**सिद्धांताचे स्पष्टीकरण (Explanation of Theory) :**

प्रा. हायेक यांच्या सिध्दांताची सुरुवात समतोल अर्थव्यवस्थेपासून होते. त्यांच्यामते उत्पादनाची रचना दोन पातळीवर कार्य करते, उच्च पातळीवर भांडवली वस्तुंच्या उत्पादनाचे कार्य चालते तर खालच्या पातळीवर उपभोग्य वस्तुंच्या उत्पादनाचे कार्य चालते तर उत्पादनाची रचना समतोल स्थितीत असताना बचत गुंतवणूकीत व्याज दरामार्फत समानता प्रस्थापित झालेली असते. अशा अवस्थेत नैसर्गिक व्याजदर आणि बाजारातील व्याजदर एक समान असतो. उपभोग्य वस्तुंचे उत्पादन त्या वस्तुंना पैशाच्या स्वरुपात असणाऱ्या मागणी इतके असते. भांडवली वस्तुंचे उत्पादन त्या वस्तुंना पैशाच्या स्वरुपात असणाऱ्या मागणीइतकेच असते. त्यामुळे उत्पादनाची साधने संबंधित उत्पादनासाठी आवश्यक एवढी उपलब्ध होतात. पुर्ण रोजगाराची अवस्था असते. साहजिकच

पैशाच्या क्षेत्रात व वास्तव क्षेत्रात समतोल निर्माण होतो. उदा. समजा बाजारातील व्याजाचा दर १५% आहे. देशाचे राष्ट्रीय उत्पन्न ५० कोटी रुपये आहे. त्यातील ४० कोटी रुपये उपभोगासाठी खर्च केले जात असेल तर १० कोटी रुपये बचत केली जात आहे. अशा स्थितीत उत्पादक ४० कोटी रुपयांच्या उपभोग्य वस्तुंची निर्मिती करतील आणि १० कोटी रुपयांच्या भांडवली वस्तुंची निर्मिती केली जाईल. त्यामुळे उत्पादनाच्या रचनेत काहीही बदल होणार नाही.

प्रा. हायेकचा सिध्दांत उत्पादक वस्तू आणि उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनातील संतुलनावस्थेचे विश्लेषण करणारा आहे. उत्पादन पध्दतीला उत्पादन रचना म्हटले आहे. उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाची खालची पातळी मानली जाते तर भांडवली वस्तुंच्या उत्पादनाची वरची पातळी मानली जाते. उत्पादनाच्या घटकाचा अवलंब केल्यापासून वस्तूचे प्रत्यक्ष उत्पादन होईपर्यंत जो कालावधी लागतो त्याला ''उत्पादन कालावधी'' म्हटले जाते. अधिक भांडवल प्रधान किंवा अप्रत्यक्ष उत्पादन पध्दतीचा अवलंब केला तर उत्पादनाच्या कालावधीत वाढ होते.

संघटकाला वस्तूच्या उत्पादनातून नफा मिळतो. जेव्हा उत्पादनाच्या विभिन्न पातळीला नफा समान असेल तर संघटक उत्पादन रचनेत काहीच बदल करणार नाही. या स्थितीत उत्पादन रचना संतुलनावस्थेत राहील आणि या स्थितीत जो नफा मिळतो तो प्रचलित व्याजदराबरोबर राहील. जर अशी स्थिती नसेल तर उत्पादन रचना स्थिर राहणार नाही. जेव्हा उत्पादन रचना संतुलनावस्थेत असते तेव्हा उत्पादक वस्तूंचे आणि उपभोग्य वस्तूंचे समान प्रमाणात उत्पादन करतात.

## बँकांच्या धोरणामुळे स्थित्यंतरे

प्रा.हायेक यांच्यामते व्यापारी बँकांनी व्याजदरात करण्याचे धोरण स्विकारल्यामुळे उत्पादकांची दिशाभूल होते. त्याचा उत्पादनाच्या रचनेवर परिणाम होऊन तेजी अथवा मंदी निर्माण होते.

समजा, नैसर्गिक व्याजाचा दर १५% असताना बँकांनी १२% व्याजदर आकारल्यास उत्पादकाचा असा समज होतो की, लोकांनी पुर्वीपेक्षा जास्त बचत केल्यामुळे पैशाचा पुरवठा वाढला असुन व्याजाचा दर १५% वरुन १२% झाला आहे. त्यामुळे उत्पादक पुर्वी एवढया उपभोग्य वस्तुंचे उत्पादन करणार नाहीत.

भांडवल वस्तुंच्या उत्पादनातील स्थित्यंतरे महत्वाची असतात. मंदीच्या काळात बँकांकडे भरपुर पैसा शिल्लक असतो कारण कर्जाला मागणी नसते. अशावेळी नैसर्गिक व्याजदरापेक्षा बाजारातील व्याजदर कमी होतात. श्रमप्रधान उत्पादन तंत्रापेक्षा भांडवल प्रधान उत्पादन तंत्र अधिक फायदेशीर ठरते. बँका कमी व्याजदराने अधिक कर्ज देण्यास उत्सुक असतील तर पत निर्मिती विस्तारते, बचतीपेक्षा गुंतवणूक जास्त होते गुंतवणुकीतील वाढीमुळे उत्पादन पध्दती दिर्घसुत्री बनते. उपभोग्य वस्तुंच्या निर्मितीमधील भांडवल गुंतवणूकीपेक्षा भांडवली वस्तुंमधील गुंतवणुक अधिक लाभदायक ठरत असल्यामुळे पैशातील जास्तीत जास्त साधनसामग्री भांडवली वस्तुंच्या निर्मितीसाठी वापरली जाते. त्यामुळे उपभोग्य वस्तुंचे उत्पादन होते. एकुण मागणीच्या मानाने त्याचा पुरवठा कमी झाल्याने त्यांच्या किंमती वाढतात. त्यातील नफ्याचे प्रमाण वाढू लागते.

उत्पादन घटक मिळविण्यासाठी जी स्पर्धा चालु असते त्यामधुन भांडवली वस्तुंचा उत्पादन खर्च अधिक

वाढतो. त्यातील नफ्याचे प्रमाण कमी होऊ लागते. याच काळात बँका आपला पत विस्तार कमी करण्याचे धोरण स्वीकारतात. पुर्वीची कर्जे वसुली करण्याचे प्रयत्न केले जातात. नैसर्गिक व्याजदरापेक्षा बाजारातील व्याजदर वाढविले जातात. त्याचा गुंतवणूकीवर प्रतिकुल परिणाम होतो. उत्पादन पध्दतीमध्ये श्रमप्रधान तंत्राला चालना मिळते. परंतु एकुण अर्थव्यवहारांचा गदारोळ झाल्यामुळे अर्थव्यवस्थेत मंदीची अवस्था पसरते.

थोडक्यात, व्यापारी बँकांचे बाजारातील व्याजदर नैसर्गिक व्याजदरापेक्षा कमी जास्त झाल्यास उत्पादन पध्दतीत बदल घडुन येतात. भांडवली वस्तुच्या उद्योगातील अतिरिक्त गुंतवणुक व भांडवल प्रधान दिर्घसुत्री उत्पादन पध्दती यामुळे अर्थव्यवस्थेत तेजी निर्माण होते. तर श्रम प्रधान अल्पकालीन उत्पादन पध्दती यातुन अर्थव्यवस्थेचे आकुंचन होऊन मंदी निर्माण होते. प्रा. हायेक यांच्यामते बँका पैशाचा पुरवठा कमी जास्त करीत असल्याने व्यापार चक्रांची निर्मिती होते, हे टाळण्यासाठी बँकांनी तटस्थ पैशाचे धोरण स्विकारले पाहिजे.

**टिकात्मक परिक्षण (Critismc of Theory)**

प्रा. हायेक यांचा सिध्दांत सुसंगत आणि संयुक्तिक वाटत असला तरी या सिध्दांताची गृहीते वस्तुस्थितीशी जुळवणारी नाहीत म्हणुन या सिध्दांतावर पुढील प्रमाणे टिका करण्यात येते.

**१. पुर्ण रोजगाराचे गृहीतक अवास्तव: :** प्रा. हायेक यांनी अर्थव्यवस्थेत पुर्ण रोजगारी असते असे गृहीत धरले आहे. ते अवास्तव आहे त्यामुळे उपभोग्य वस्तुंच्या निर्मितीसाठी वापरली जाणारी साधनसामग्री भांडवली वस्तुंच्या निर्मितीसाठी वापरली जाईल असे म्हणणे चुक ठरते. बऱ्याचवेळा साधनसामग्री न वापरलेल्या स्थितीत पडून असते. अशा स्थितीत भांडवली वस्तुंचे उत्पादन वाढविण्यासाठी उपभोग्य वस्तुंचे उत्पादन कमी करण्यासाठी जरुरी भासत नाही.

**२. गुंतवणुक व व्याजदर सहसंबंध :** या सिध्दांतात गुंतवणूक ही व्याजदरावर अवलंबुन असते, असे म्हटले आहे. परंतु प्रत्यक्षात व्याजदराशिवाय इतर अनेक घटक गुंतवणुकीवर परिणाम करतात. त्याकडे या सिध्दांताने दुर्लक्ष केले आहे.

**३. नैसर्गिक व्याजदर आणि बाजार व्याजदरातील असमानता :** प्रा. हायेक यांच्यामते बचत गुंतवणूक समान राहण्यासाठी आणि किंमत स्थैर्यासाठी नैसर्गिक व्याजदर आणि बाजारातील व्याजदर समान असले पाहिजेत. परंतु अर्थशास्त्रज्ञ डेव्हिड सनने असे दाखवून दिले आहे की, किंमत स्थैर्यासाठी नैसर्गिक व्याजदर आणि बाजारातील व्याजदर समान नसले तरी चालु शकते.

**४. बँकांच्या पत निर्मितीला महत्व :** प्रा. हायेक यांच्यामते बचत गुंतवणुकीचा समतोल हा बँकाच्या पतनिर्मितीच्या धोरणातील बदलांमुळे होतो. परंतु हे विधान इतिहासाने चुकीचे ठरविले आहे.

**५. अवास्तव विधाने :** जास्त गुंतवणूक झाली की, उत्पादनाला प्रदिर्घ कालावधी लागतो. उपभोग्य वस्तुंना मागणी वाढली की उत्पादन प्रक्रिया संकुचित होते, बचत वाढली की, उपभोग्य वस्तुंच्या किमती कमी होतात ही हायेकची विधाने नेहमी खरी ठरणारी नसल्याने ती अवास्तव आहेत.

**६. अचलनजन्य घटकांकडे दुर्लक्ष :** हायेक यांनी चलनविषयक घटकांना अधिक महत्व दिले आहे. तर अचलनजन्य घटकांकडे दुर्लक्ष केले आहे.

**७. अवस्थांचे स्पष्टीकरण :** हायेक यांच्या व्यापार चक्राबाबत सिध्दांतात व्यापार चक्राच्या भिन्न अवस्थांचे नेमके स्पष्टीकरण मिळत नाही.

**८. व्याजदरावर भर :** सिध्दांतात व्याजदराला अवास्तव महत्व देण्यात आले आहे. हायेक यांच्यामते गुंतवणूकीचा सर्वात महत्वाचा निर्णायक घटक म्हणजे व्याजदर होय. परंतू हे मत अनेक अर्थशास्त्रज्ञांना मान्य नाही.

**९. मुद्रेचा स्थिर पुरवठा :** चक्रीय उच्चावचेन नियंत्रित करण्यासाठी हायेक यांनी मुद्रेचा पुरवठा स्थिर ठेवला पाहिजे असे मत मांडले होते. मुद्रेचा पुरवठा स्थिर नसेल तर अर्थव्यवस्थेत उच्चावचेन निर्माण होतील असे त्यांचे मत होते. त्यांनी आर्थिक स्थिरता प्रस्थापित करण्यासाठी ज्या तटस्थ मौद्रिक धोरणाची शिफारस केली होती ते अवास्तविक व अव्यवहार्य होते.

**१०. संतुलनावस्था :** हायेक यांच्यामते, अर्थव्यवस्थेत सुरुवातीला बचत व गुंतवणूकीत समानता आढळून येते. नंतर बचत व गुंतवणुकीचे संतुलन बँक धोरणामुळे ढासळते. टिकाकारांच्यामते, संतुलन अनेक बाह्य घटकांवर अवलंबून असते.

**११. भांडवली वस्तूंची मागणी व्युत्पन्न असते :** भांडवली वस्तूंची मागणी म्हणजे उपभोग्य वस्तूंसाठी व्युत्पन्न मागणी होय. उपभोग्य व भांडवली वस्तूंच्या मागणीत स्पर्धा आढळते.

**१२. पुर्ण रोजगारीचे गृहीत :** हायेक यांचा सिध्दांत उत्पादक घटकांच्या पुर्ण रोजगारीवर आधारित आहे. हायेक यांच्यामते, पूर्ण रोजगारी असताना भांडवली वस्तूंच्या उत्पादनात वाढ करावयाची असेल तर उपभोग्य वस्तूच्या उत्पादनात घट करावी लागेल.

**१३. व्याजाचा दर पुर्णतः मौद्रीक घटना नाही :** हायेकच्या सिध्दांतानुसार व्याजदर ही मौद्रीक घटना मानली आहे. परंतु प्रत्यक्षात व्याजदर अनेक घटकांवर अवलंबून असतो.

**१४. वर्तमान गुंतवणुकीच्या त्यागाचे कारण :** संघटक आपल्या वर्तमान गुंतवणुकीचा त्याग करुन ज्या उत्पादन पध्दतीत भांडवलाचा कमी उपयोग होतो तिचा स्वीकार करतो असे म्हणणे अयोग्य आहे.

**१५. अपुर्ण सिध्दांत :** या सिध्दांतात व्यापार चक्राच्या विविध अवस्थांचे स्पष्टीकरण केलेले नाही. या सिध्दांतात मुख्य भर तेजीच्या अवस्थेचे विवेचन करण्यावर देण्यात आला आहे.

**१६. सक्तीच्या बचतीची निर्मिती होत नाही :** प्रा. हायेक यांनी आपल्या विवेचनात सक्तीच्या बचतीला महत्वाचे स्थान दिले आहे. परंतु सक्तीच्या बचतीवर प्रा. स्ट्रिगल यांनी टीका केली. अर्थव्यवस्थेत फक्त ऐच्छिक बचत झालेली आढळून येते.

**१७. वस्तुंच्या विक्रीचा गुंतवणुकीवर परिणाम :** प्रा. हायेक यांचे असे मत होते की, एका विशिष्ट

कालावधीत उपभोग्य वस्तूंची विक्री झाली नाही तर नंतरच्या काळात गुंतवणूकीत वाढ होते. परंतू हे अगदी चुकीचे आहे.

### शुंपीटरचा व्यापार चक्राचा सिध्दांत :
### (Schumpeter's Theory of Trade Cycle):

**प्रस्तावना :**

जोसफ ए. शुंपीटर यांनी आपल्या "Business Guide" या ग्रंथात व्यापार चक्राविषयी नवोन्मेष सिध्दांत मांडला. हा सिद्धांत नवप्रर्वतन सिध्दांत म्हणूनही ओळखला जातो.

शुंपीटर यांच्यामते, औद्योगिक व व्यापारी क्षेत्रातील नाविन्याचा अवलंब केल्यामुळे चक्रीय बदल घडून येतात भांडवलशाही अर्थव्यवस्थेत सतत विकास होत असतो. हा विकासाचा मार्ग सरल नसुन तो अनेक धक्क्यांनी भरलेला असतो. संयोजक घटकांना एकत्र आणण्याचे कार्य करत नसून उत्पादनात नाविन्यता आणण्याचे कार्य करतो. यालाच नवप्रवर्तन असे म्हणतात. नवीन शोध लावले जाऊन त्यांचा उपयोग व्यापार क्षेत्रात केल्याने अर्थव्यवस्थेत चक्रीय चढ-उतार होतात.

शुंपीटरच्यामते, भांडवलाशाही अर्थव्यवस्था जर स्थिर राहिली तर अर्थव्यवस्थेत व्यापाराचे चढ-उतार निर्माण होणार नाहीत. स्थिर अर्थव्यवस्थेत उपभोक्त्याच्या आवडी निवडी कायम राहतात. त्यामुळे व्यापार चक्राची निर्मिती होत नाही. युध्द, दुष्काळ, सरकारी कायदा यासारख्या बाह्य घटकांमुळे अर्थव्यवस्थेत होणारे चढ-उतार व्यापार चक्रातील तेजी मंदीच्या अवस्थेप्रमाणे नियमित असणार नाही म्हणून त्यांना व्यापार चक्रे असे म्हणता येणार नाही.

शुंपीटरच्या सिध्दांतात नवोन्मेष, संयोजक या दोहोंना फार महत्वाचे स्थान आहे. संयोजक हा केवळ उत्पादनाचे घटक एकत्र आणण्याचे नवीन कार्य करतो. व्यापार उद्योग, उत्पादन इत्यादी क्षेत्रात लागणाऱ्या नवीनशोधांचा व्यवहारात वापर केला जातो. तांत्रिक शोधामुळे उत्पादन पध्दतीत बदल होतो. त्याचा परिणाम व्यापार उत्पादन उत्पन्न व रोजगार यांच्यावर होऊन व्यापारामुळे निर्माण होतात. भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील खाजगी व्यक्ती वा संस्था यांचा जास्तीत जास्त नफा मिळविणे हा उद्देश नसतो स्पर्धायुक्त परिस्थितीमुळे किमतीत वाढ करुन मिळविता येत नाही. म्हणून ते उत्पादन खर्च कमी करण्याचा प्रयत्न करतात. नवीन शास्त्रीय शोध, नवीन तांत्रिक ज्ञान इत्यादी वापराने उत्पादन खर्च कमी होण्यास मदत होते. नफा वाढतो.

**नवप्रवर्तन :** या संज्ञेचा अर्थ शुम्पिटरने बराच व्यापक केला आहे. नव-प्रवर्तन म्हणजे नवीन श्शोध नव्हे आणि नवीन शोध चक्रीय पध्दतीने होतात असेही श्शुम्पिटरचे म्हणणे नाही. नव-प्रर्वतन म्हणजे नवीन तंत्र, नवीन पध्दती, नवीन बाजारपेठा इत्यादींचा व्यापारी व्यवहारामध्ये उपयोग, अशा प्रकारचे नव-प्रवर्तन हेच त्यांच्यामते चक्राकार चढ-उतारांचे मूळ कारण आहे. हे नव-प्रर्वतन व्यापक स्वरुपाचे असेल तरच विद्यमान व्यवस्था बिघडते. आणि नवीन परिस्थितीशी जुळवून घेण्याची प्रक्रिया सुरु होते.

नव-प्रर्वतनाच्या अभावी अर्थव्यवस्था संतुलनावस्थेत असते. या अवस्थेला शुंपीटरने 'चक्राकार ओघ' (Cir-

cular Flow) असणारी अर्थव्यवस्था असे म्हटले आहे. या स्थितीत लोकसंख्येचा आकार तसेच रचना (वयानुसार विभागणी इ.) कायम राहून लोकसंख्येची पुनर्निर्मिती होत असते. आवडी निवडी, उत्पादन तंत्र, साधनधन इत्यादी सर्वच स्थिर राहतात. चक्राकार ओघ असणाऱ्या अर्थव्यवस्थेत शुध्द बचत किंवा शुध्द गुंतवणूक होत नाही. भांडवलाची पुनर्भरपाई करुन विद्यमान साठा टिकविण्यात येतो, त्यात भर पडत नाही. आर्थिक प्रक्रिया स्थिर दराने जशाच्या तशा पुनःपुन्हा होत जातात. पुढे काय घडणार हे निश्चितपणे आगाऊच ठाऊक असल्यामुळे चुकीच्या अपेक्षांचा प्रश्नच निर्माण होत नाही. अर्थव्यवस्थेची ही संतुलनावस्था असते. वस्तू आणि उत्पादक घटकांच्या पुरवठयाचे त्यासाठी असणाऱ्या मागणी आणि किंमतीशी पूर्ण समायोजन झाल्यामुळे बेकारी निर्माण होत नाही. व्यापारी संस्था उपलब्ध असणाऱ्या अत्युत्तम तंत्राचा वापर करुन युक्त पातळीवर उत्पादन करीत असतात.

शुंपीटरच्या सिध्दांतात उपक्रमी आणि नव-प्रर्वतनाला अतिशय महत्वाचे असे स्थान नव-प्रर्वतन निर्माण होताच अर्थव्यवस्थेचे संतुलन ढळते. शुध्द बचत आणि शुध्द गुंतवणूक होऊ लागून त्यात चढ-उतार होत जातात. अर्थव्यवस्थेतील बदलत्या घटकांमध्ये अनपेक्षित बदल होऊ लागतात. याचा परिणाम म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नातही चढ-उतार होत जातात. शुंपीटरच्या मते प्रगतीसाठी सहन करावी लागणारी ही एक प्रकारची शिक्षाच आहे.

व्यापार चक्राच्या अवस्थांबाबत शुंपीटरची भूमिका पुढीलप्रमाणे -

**१. समृध्दी** (Prosperity) **:** अर्थव्यवस्था संतुलनावस्थेत असताना देशातील उत्पादक साधने पुर्णतः उपयोगात आलेली असून बचत गुंतवणुकीबरोबर असते. या स्थितीत एखादा उपक्रमी किंवा काही संयोजक एखादी नवीन प्रक्रिया किंवा नवीन पध्दती फायदेशीर होईल अशा विश्वासाने उत्पादनाच्या विद्यमान व्यवस्थेत बदल करतात. या उपक्रमासाठी त्यांना व्यापारी बँका पैसा पुरवितात. नवप्रर्वतक हाती घेतलेल्या उद्योगांकडे इतर क्षेत्रातील साधनसामग्री वळवितात. यामुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेतील खर्चाचा ओघ वाढू लागतो, किंमती वाढतात आणि इतर संयोजकही या नव-प्रर्वतकांचे अनुकरण करु लागतात. नवीन गुंतवणूकीला उधाण येते आणि अर्थव्यवस्थेचा विस्तार होऊ लागतो.

**२. घसरण** (Recession) **:** नव-प्रर्वतनामुळे वस्तूंचा पुरवठा वाढू लागे पर्यंत विस्ताराची प्रक्रिया सुरु राहते. काही क्षेत्रात किंमती घसरु लागतात. या क्षेत्रातील व्यापारी बँकांची कर्जे परत करु लागतात आणि चलन पुरवठयाचा संकोच होतो. याचा परिणाम म्हणजे घसरणीला सुरवात होते. अर्थव्यवस्थेचे नवीन संतुलन प्रस्थापित होईपर्यंत ही घसरण सुरु असते. घसरणीचा काळ म्हणजे, अशा रितीने, अर्थव्यवस्थेची नवीन परिस्थिती जूळवून घेण्याची धडपड असते. या काळात अर्थव्यवस्थेचे नव-प्रर्वतनाशी समायोजन घडून येते. याचबरोबर तेजीच्या काळात निर्माण झालेल्या अपेक्षा पूर्ण होण्याचाही हा काळ असतो. उत्पादनाची काही प्रमाणात पुनर्रचना होऊन नवीन पध्दतीचा अवलंब केल्यामुळे उत्पादन खर्चात घट होते. नवीन पध्दतीचा सर्वदूर वापर करण्यात येतो. काही जुजबी स्वरुपाच्या सुधारणाही अर्थव्यवस्थेत होऊ लागतात. या सर्वाचा परिणाम म्हणजे वस्तूंचा पुरवठा वाढत जातो. नव-प्रर्वतनामुळे नवीन गुंतवणूकीला उत्तेजन मिळून काही उद्योगधंद्यांचा विस्तार वाढतो तर काही उद्योगाचे आधुनिकीकरण होते. तीव्र स्पर्धा सुरु झाल्यामुळे अकार्यक्षम असणारे उद्योग नष्ट होतात.

**३. मंदी** (Depression) **:** गंभीर स्वरुपाच्या मंदीचे अस्तित्व शुंपीटर अमान्य करीत नाही. परंतु अर्थव्यवस्था

कार्यप्रवण असण्यासाठी 'गंभीर मंदी' (Deep Depression) अनिवार्य नाही, असे त्याचे मत आहे. समृध्दीच्या काळात घडणाऱ्या दुय्यम स्वरुपाच्या घटनांमुळेच मंदीच्या चक्राची बीजे रोवली जातात. उपभोक्ते आणि व्यापारी यांच्या कृतीमुळे बँकेच्या कर्जाचा अतिरिक्त विस्तार होतो. अतिआशादायी वातावरणामुळे परिकल्पनाला उत्तेजन मिळते. नव-प्रवर्तनामुळे व्यवहारांमध्ये एक प्रकारचे असंतुलन निर्माण होऊन व्यापारी चुकीचा निर्णय घेतात. याचा परिणाम म्हणजे अर्थव्यवस्थेत विविध प्रकारची विसंगती निर्माण होते. घटनांच्या या क्रमाला शुंपीटरने 'दुय्यम लाटा' (Secondary Waves) असे म्हटले आहे. नव-प्रवर्तनाच्या प्रक्रियेमुळे विस्ताराच्या 'प्राथमिक लाटा' (Primary Waves) निर्माण होतात. अर्थव्यवस्थेचा अति-विस्तार आणि उपभोक्ते तसेच व्यापाऱ्यांचा अतिरिक्त-कर्जबाजारीपणा, हे या दुय्यम लाटांचे प्रातिनिधिक स्वरुप म्हणता येईल. नव-प्रवर्तनामुळेच निर्माण झालेले परिवर्तन एकदा खालच्या दिशेला सुरु झाले म्हणजे ओहोटी सुरु होऊन त्यानंतर चलनघटी (Deflation) दुय्यम लाट अर्थव्यवस्थेत होते. घसरणीच्या काळात संतुलन निर्माण करणाऱ्या शक्ती प्रभावी असतात. तीव्र चलनघटीच्या प्रक्रियेमुळे या शक्ती समूळ नष्ट होऊन अर्थव्यवस्था मंदीच्या गर्तेत जाते.

**४. पुनरुत्थान** (Revival) **:** शुंपीटरच्या यांच्यामते अर्थव्यवस्थेत अशा काही शक्ती सतत कार्यरत असतात की त्यांचेमुळे मंदी येऊन अर्थव्यवस्था सुधारण्याची प्रक्रिया सुरु होते. यादृष्टीने 'प्रभाव कमी करणाऱ्या संधी' महत्वाच्या आहेत. मंदीच्या काळातील प्रत्येक घटनेचा प्रभाव विस्तृत होत जातो, हे जरी खरे असले तरी प्रभावाची शक्ती उत्तरोत्तर कमी होत जाते. हेही लक्षात घेतले पाहिजे. मंदीला थोपविणाऱ्या दुसऱ्या प्रमुख प्रवृत्तीला शुंपीटरने 'मंदीचा व्यापार' (Depression Business) असे म्हटले आहे. मंदीच्या काळात काही व्यापारी संस्था बंद पडल्या तरी इतर संस्था टिकून राहतात. बंद पडलेल्या व्यापारी संस्थांचा व्यापार टिकविणाऱ्या संस्थांना मिळून त्यांचा व्यापार वाढत जातो. हा मंदीचा व्यापार होय. मंदीला रोखणारा तिसरा प्रमुख घटक म्हणजे सीमांत उपभोग प्रवृत्ती. ती सामान्यतः एकापेक्षा कमी असते, हे होय. उपभोग उत्पन्नाच्या तुलनेत कमी प्रमाणात असतो. यामुळे एका मर्यादे पलीकडे मागणीत घट होत नाही. साठा एकदा एका विशिष्ट खालच्या पातळी पर्यंत कमी झाला म्हणजे तो पुन्हा वाढविण्याची आवश्यकता निर्माण होते. तसेच समाजातील काही लोकांचे उत्पन्न इतके अधिक असते की कितीही मंदी आली तरी त्यांच्या खर्चाच्या प्रमाणात बदल होत नाही. या आशावादी घटकांच्या अस्तित्वामुळे अर्थव्यवस्थेचे पुनरुत्थान शक्य होते.

**नवोन्मेष म्हणजे संशोधन नव्हे**

शास्त्रीय व तांत्रिक क्षेत्रातील शोधांचा आणि संशोधनाचा उपयोग व्यापार क्षेत्रात करुन उत्पादन खर्च कमी करणे म्हणजे नवोन्मेष होय. उद्योग व्यापारांच्या क्षेत्रात नवीन उत्पादन घटकांचा वापर करणे, नवीन व्यवस्थापन पध्दतीचा अवलंब करणे, नवीन वस्तु निर्मिती करुन मागणी वाढविणे, नवीन प्रदेश अगर संस्थांवर नियंत्रण ठेवून अधिक कच्चा माल उपलब्ध करुन घेणे, नवीन तंत्रातील ज्ञानाचा वापर करणे याबाबतीत संयोजक जागरुक असतो. या सर्वांना शुंपीटर नवप्रवर्तन म्हणतो याचा वापर करुन उत्पादन खर्च कमी करुन भरपूर नफा मिळविला जातो.

उत्पादकांनी अशा नाविन्याचा अवलंब करुन अधिक नफा मिळविण्यास सुरुवात केली की त्याचा परिणाम संपुर्ण अर्थव्यवस्थेवर होतो. इतर उत्पादक ही त्याचे अनुकरण करु लागतात आणि अर्थव्यवस्थेचा समतोल बिघडतो.

नाविन्यासाठी भांडवली वस्तुंची मागणी वाढते, त्यासाठी उत्पादन, रोजगारी, वेतन, किंमती इत्यादीमध्ये वाढ होऊन तेजीची परिस्थिती निर्माण होते.

बाजारात तेजीची परिस्थिती असेल, कामगारांची टंचाई असेल तर नाविन्याचा अवलंब करणारा संयोजक जादा कामगार मिळविण्यासाठी अधिक मजुरी देण्यास तयार होईल. आपल्या कारखान्यातील कामगार इतरत्र जाऊ नयेत, इतर कारखानदारी कामगारांना उत्पादन खर्च करणाऱ्या उत्पादकांचा उत्पादन खर्च वाढेल कामगारांचा वेतन दर वाढल्याने त्यांचे उत्पन्न वाढून खरेदी शक्तीत वाढ होते. ते विविध वस्तु व सेवांची मागणी मोठया प्रमाणात करतील त्याचा कायदा कारखानदारांना जास्त मिळेल.

एखाद्या संयोजकाने उत्पादन नाविन्याचा अवलंब करुन गुंतवणूक वाढविल्यामुळे त्याच्या फायद्यात भरपुर वाढ होते. इतर संयोजकांच्या हे लक्षात आल्यावर तेही नाविन्याचा अवलंब करतात, त्यांच्या अनुकरणाने भांडवल गुंतवणूक भरमसाठ वाढते, रोजगार, उत्पन्न इत्यादींमध्ये वाढ होऊन अर्थव्यवस्था तेजीच्या शिखरावर पोहचते.

हि तेजीची अवस्था अल्पकाळ टिकते, सर्वच संयोजकांनी या नाविन्याचा अवलंब केल्याने नाविन्य संपुष्टात येते. सर्वांच्या वस्तू सारख्याच असून त्यांचे भरपूर उत्पादन झालेले असल्याने पुरवठा मागणीपेक्षा जास्त होतो. वस्तुंच्या किंमती कमी होण्यास सुरवात होते. नफ्याच्या प्रमाणात घट होऊन लागते. संयोजकांनी केलेली गुंतवणुक कायदेशीर ठरत नाही. यामुळे तेजी संपुष्टात येऊन अर्थव्यवस्थेला कलाटणी मिळते. आणि घसरणीची अवस्था सुरु होते. नवीन गुंतवणूक रोखली जाते. सर्वत्र निराशाजनक वातावरण निर्माण होऊन अर्थव्यवस्थेत मंदी येते. भांडवली वस्तुंची मागणी कमी होऊन प्रभावी मागणी घटते. किंमती कमी होतात. ते पर्यायी रोजगार शोधतात, कामगारांचे वेतन घटते, त्यांची खरेदी शक्ती कमी होऊन प्रभावी मागणी घटते, किंमती कमी होतात त्याचा परिणाम इतर क्षेत्रावर होऊन अर्थव्यवस्थेत मंदीची लक्षणे दिसतात.

मंदीच्या काळात अगदी खालच्या पातळीवर अर्थव्यवस्थेत नव्या शोधांमुळे अर्थव्यवस्थेला कलाटणी मिळून अर्थव्यवस्थेत पुनरुज्जीवन घडून येते. पून्हा नवीन शोध लागले जाऊन उद्योग व्यापारात त्याचा वापर करण्याचा प्रयत्न होतो. यामधुन अर्थव्यवस्था मंदीतून तेजीकडे वाटचाल करते.

थोडक्यात, शुंपीटरच्यामते नवीन शोधामुळे तेजी मंदी चक्र निर्माण होऊन तेजी, घसरण, मंदी व पुनरुजीवन या अवस्था निर्माण होतात.

**सिध्दांतावरील टिका (Critics of the Theory) :**

१. केवळ नवीन शोधांमुळे व्यापारचक्र निर्माण होतात असे म्हणणे योग्य नाही. व्यापार चक्र निर्मितीचे ते एकमेव कारण नव्हे. इतर ही कारणे व्यापार चक्राच्या निर्मितीस कारणीभूत ठरतात. याकडे या सिध्दांताचे दुर्लक्ष झाले आहे.

२. नवप्रर्वतन केवळ बँकांकडून कर्जे काढून गुंतवणूक करतात असे म्हणता येत नाही. भाग धारक ठेवीदार रोखेदार, भांडवली संस्था, खाजगी व्यक्ती, सरकार किंवा परकीय संस्था इत्यादी मार्गांनी भांडवल पुरवठा होऊ शकतो. याकडे या सिध्दांताने दुर्लक्ष केले आहे.

३. पुर्ण रोजगारीच्या गृहितावर हा सिध्दांत आधारीत आहे. पण अर्थव्यवस्थेत पुर्ण रोजगार नसतो. अशावेळी नवप्रवर्तनाचा अवलंब केल्यास जुन्या उद्योगातील उत्पादक घटक नवीन भांडवल निर्मितीच्या क्षेत्रात जाण्याची शक्यता नसते. त्यामुळे किंमतीत, उत्पादन खर्च यामध्ये मोठी वाढ होण्याची शक्यता नसते. या सिध्दांताने गृहीत मानलेली पुर्ण रोजगारीची परिस्थिती सहसा आढळत नाही.

४. शुंपीटरचा सिध्दांत अर्थव्यवस्थेतील संख्यात्मक रचनेच्या गृहीतावर आधारीत आहे. पण समाजाची संख्यात्मक अशी  विशिष्ठ चौकट आढळत नाही.

**लॉर्ड केन्सचा व्यापार चक्राचा सिध्दांत (Keynesian Theory of Trade Cycle) :**

लॉर्ड केन्स यांनी व्यापार चक्राचा सिध्दांत याआधी असा कोठेही मांडलेला नाही. केन्स यांनी रोजगारीच्या अनुषंगाने जे विचार मांडले आहेत, त्यावरुन त्यांचे व्यापार चक्राविषयीचा दृष्टिकोन कळून येतो. काहीजण यालाच केन्सचा 'बचत-गुंतवणुक सिध्दांत' असेही म्हणतात.

लॉर्ड केन्स म्हणतात, ''सीमांत लाभक्षमतेतील चक्रीय आंदोलनाचे (चढ-उताराचे) स्पष्टीकरण म्हणजे व्यापार चक्राचे स्पष्टीकरण होय. भांडवलांच्या सीमांत लाभक्षमतेवर विविध घटकांचा परिणाम होत असतो. त्यामुळे भांडवलांच्या सीमांत लाभक्षमतेत निश्चित स्वरुपाचे चढउतार घडून येतील असे गृहीत धरता येत नाही.''

त्यांच्यामते, ''व्यापार चक्र म्हणजे वाढत्या किंमती व अल्प बेकारीचे प्रमाण वैशिष्टये असलेली उत्तम व्यापाराच्या स्थितीचे स्थित्यंतर, घटत्या किंमती व उच्च बेकारीचे प्रमाण वैशिष्टय असलेल्या वाईट व्यापार स्थितीत होणे होय.''

केन्सचा 'General Theory of Employment, Internest and Money' हा ग्रंथ व्यापार चक्र विश्लेषणाच्या विकासातील एक महत्वपुर्ण घटना होय. त्यांचा सिध्दांत उत्पन्न निर्धारणाच्या दृष्टीने महत्वाचा असला तरी केन्स यांचे व्यापार चक्रातील योगदान प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या महत्वपूर्ण ठरते.

न्यून रोजगार पातळीला अर्थव्यवस्थेचे संतुलन प्रस्थापित होते असे केन्स यांचे मत होते. व्यापार चक्राच्या वळण बिंदूचे अंतर्गत स्पष्टीकरण केन्सच्या 'सामान्य सिध्दांतापूर्वी' विचारवंतांनी केले नव्हते. त्यांनी केवळ व्यापार चक्राच्या वळण बिंदूंना कारणीभूत बाह्य घटकांचे विवेचन केले होते. केन्स यांनी व्यापार चक्र विश्लेषणाला सांख्यिकीय आधार मिळवून दिला. त्यांनी भांडवलाची सीमांत लाभक्षमता ही गतिमान संकल्पना उपयोगात आणली.

केन्सच्या मते, व्यापार चक्र म्हणजे अशाप्रकारचे चक्रीय बदल होत की, जे भांडवलाच्या सीमांत लाभक्षमतेच्या चक्रीय बदलामुळे निर्माण होतात ती गुंतागुंतीची घटना होय आणि वारंवार अर्थव्यवस्थेच्या इतर महत्वपुर्ण अल्पकालीन परिवर्तनामुळे गहनता वाढत जाते.

**सिध्दांताचे स्पष्टीकरण (Explanation of Theory) :**

**१. आर्थिक संकट** (Economic Crisis) **:** केन्सच्या मते तेजीच्या काळात गुंतवणुकीवर नियंत्रण ठेवणारा घटक म्हणजे व्याजदरातील वाढ नव्हे तर तेजीच्या कालखंडात गुंतवणूकीत घट होण्याचे कार म्हणजे भांडवलाच्या

सीमांत लाभक्षमतेतील घट होय. तेजीच्या अंतिम अवस्थेत अवास्तव आशावाद दिसून येतो. आशावाद इतका अधिक असतो की, व्यक्तींवर उत्पादन खर्चातील वाढीचा किंवा व्याजदरातील वाढीचा काहीच परिणाम घडून येत नाही. वर्तमानकालीन उत्पन्नात घट होते, कारण नवीन उत्पादित भांडवली वस्तूंच्या साठयात वाढ होऊ लागते.

जर संघटकाला असे वाटत असेल की, भांडवली संपत्तीचा वर्तमानकालीन उत्पादन खर्च भविष्यकालीन उत्पादन खर्चापेक्षा अधिक आहे तर अशा परिस्थितीत भांडवलाच्या सीमांत लाभक्षमतेत पुन्हा घट होते, या कारणांमुळे भांडवलाची सीमांत लाभक्षमता घटते. या घटीमुळे गुंतवणूक करणाऱ्याच्या मनाचा भ्रमनिरास होतो. कारण ते भांडवल गुंतवणुकीपासून जास्त उत्पन्नाची अपेक्षा करीत असतात. संघटीत भांडवल बाजारात परिकल्पन व्यवहार वाढतात. भ्रमनिरासामुळे भांडवली संपत्तीपासून मिळणाऱ्या भविष्यकालीन उत्पन्नात एकदम बदल घडून येतात.

भांडवलाच्या सीमांत लाभक्षमतेत घट झाल्यामुळे रोखता पसंती वाढते. रोखता पसंतीत वाढ झाल्यामुळे व्याजाचा दर वाढतो. व्याजाच्या दरात वाढ झाल्यामुळे गुंतवणुकीत एकदम घट होते आणि आर्थिक संकटाची अवस्था प्रारंभ होते.

पुनरुत्थानाची अवस्था तेव्हाच निर्माण होऊ शकते की, जेव्हा भांडवलाची सीमांत लाभक्षमता खालच्या पातळीवरुन भरुन निघते परंतु यासाठी बराच कालावधी लागतो. भांडवलाच्या सीमांत लाभक्षमतेतील वाढ ही भांडवली संपत्तीच्या आयुर्मानावर अवलंबून असते.

आर्थिक संकटाच्या काळात कार्यकारी भांडवलाची निर्गुंतवणूक (Disinvestment) होते. आर्थिक संकटाच्या प्रारंभीच्या अवस्थेत उत्पादनात घट होते तेव्हा अल्प-गुंतवणूक घडून येते. ही भांडवली साठयामुळे भरुन निघते, परंतु नंतरच्या अवस्थेत कार्यकारी भांडवल आणि वस्तूंच्या साठयाबाबत निर्गुंतवणूक आढळते.

**२. तेजीची अवस्था** (Boom) **:** तेजीच्या अवस्थेत संघटकाचा दृष्टीकोन आशावादी असतो. त्यांचा भविष्यकाळावरील विश्वास पक्का असतो. भांडवलाची सीमांत लाभक्षमता बरीच जास्त असते. आर्थिक क्रियांमध्ये सतत वाढ होत असते. नवीन गुंतवणूक केली जाते. गुंतवणूकीतील वाढीमुळे राष्ट्रीय उत्पन्न, उत्पादन आणि रोजगारीत वाढ होते. गुणक कार्यप्रवृत्त होतो. तेजीची अवस्था समुच्चयात्मक बनते. तेजीच्या अंतिम अवस्थेत संघटकांचा आशावाद फारच प्रभावी असतो.

केन्स यांच्यामते, तेजीचा शेवट निश्चितपणे मंदीत होतो. मंदी निर्माण होण्याचे कारण म्हणजे पुर्ण रोजगारीच्या अवस्थेत व्याजदर आणि अपेक्षेसंबंधी अयोग्य मार्गदर्शनाची अवस्था होय. भविष्यकालीन अपेक्षांवर अवलंबून असणारा व्याजाचा दर फारच जास्त असतो. जोपर्यंत अपेक्षेशिवाय अयोग्य मार्गदर्शनाची अवस्था असते तोपर्यंत व्याजाचा दर निवारक स्वरुपाचा असतो.

तेजी अशी अवस्था होय की, ज्यामध्ये अति-आशावादाला अधिक व्याजदरावर विजय मिळतो आणि अगदी शांत परिस्थितीत ही अतिरेकाची अवस्था होय.

**३. मंदीची अवस्था** (Depression) **:** गुंतवणूक ही भांडवल गुंतवणुकीच्या पूर्णावस्थेपर्यंत वाढते. भांडवली

संपत्तीच्या वाढत्या किंमती, अपेक्षित मिळकतीमध्ये घट, भांडवलाची कमतरता, अतिरिक्त स्पर्धा, निर्मित वस्तूंची वाढती विपुलता इत्यादींमुळे संघटकाला प्रत्यक्ष स्थितीची कल्पना येते. या अवस्थेत भांडवलाच्या सीमांत लाभक्षमतेत घट होते.

जेव्हा बाजारात अति निराशावाद असतो तेव्हा बेरोजगारीत वाढ होते. गुंतवणूकीत सतत घट होते. भांडवलाच्या सीमांत लाभक्षमतेतील घटीमुळे संकुचनाची अवस्था निर्माण होते. यासाठी व्याजदरातील वाढ व गुणकाची प्रतिगामी कार्यवाही ही दोन कारणे जबाबदार असतात. तर रोखता पसंती वाढल्यामुळे व्याजदरात वाढ होते.

भांडवलाच्या सीमांत लाभक्षमतेत घट झाली तर व्यावसायिक क्रियांमध्ये घट होवून मंदीची अवस्था अस्तित्वात येते. अर्थव्यवस्थेत पुनरुत्थानाची अवस्था आणण्यासाठी विश्वासाची पुनःस्थापना करावी लागेल म्हणजे आशावादी वातावरण निर्माण करता आले पाहिजे. परंतु अति-निराशावादी वातावरणाचे रुपांतर करणे फारच कठीण होते.

**४. पुनरुजीवन** (Recovery) **:** प्रा. केन्स यांच्यामते पुनरुज्जीवन ही व्यापारी चक्राची फारच हळूहळू गती घेणारी अवस्था असते. अर्थव्यवस्थेच्या सामान्य विकास दरावरच उपभोग आणि गुंतवणुक अवलंबून असते. अर्थव्यवस्थेचा सामान्य विकास दर जास्त असेल तर उपभोग व गुंतवणूक जास्त राहील याउलट सामान्य विकास दर जर कमी असेल तर उपभोग व गुंतवणुक कमी राहील. त्याचबरोबर जर भांडवली संपत्तीचे सरासरी आर्युमान कमी असेल तर भांडवली संयंत्राचे व उपकरणांचे प्रतिस्थापन लवकरच करावे लागेल आणि स्थिर भांडवली संपत्तीमधील नवीन गुंतवणुकीमुळे मंदीच्या कालावधीत घट होईल. अर्थव्यवस्थेत मंदीची अवस्था अस्तित्वात येते तेव्हा कच्चा माल, अर्ध कच्चा माल आणि पक्का माल इत्यादींचा साठा वाढतो. या परिस्थितीत संघटकांपुढे दोन पर्याय असतात. एक म्हणजे वर्तमानकालीन कमी किंमतीला नुकसान सहन करुन मालाची विक्री करणे व दुसरे जोपर्यंत किंमत पूर्ववत पातळीपर्यंत वाढत नाहीत, तोपर्यंत मालाचा साठा जवळ बाळगणे.

पुनरुज्जीवन हळूवारपणा हा संघटकाचा मालाचा साठा जवळ बाळगणाऱ्या किंवा न बाळगणाऱ्या धोरणावर अवलंबून असतो. मंदीच्या प्रारंभीच्या अवस्थेत वस्तुंचा साठा वाढतो आणि त्या वस्तुंच्या उत्पादनात घट होण्यास सुरुवात होते. मंदीच्या नंतरच्या अवस्थेत मालाचा साठा आणि वस्तुंच्या उत्पादनाबाबत अपगुंतवणूक आढळून येते. जेव्हा पुनरुज्जीवनाची लक्षणे दिसू लागतात तेव्हा साठयातील वाढीव निर्गुंतवणूक कमी किंवा जास्त प्रमाणात वस्तुच्या उत्पादन वाढीमुळे भरुन निघते.

### सिध्दांतावरील टिका (Critisim of Theory) :

केन्स यांनी व्यापार चक्राचे अधिक शास्त्रीय विवेचन केले असले तरी अनेक विचारवंतांनी त्यांच्या व्यापार चक्राच्या सिध्दांतावर टीका केल्या आहेत.

**१) भांडवलाची सीमांत लाभक्षमता संदिग्ध व भ्रामक संकल्पना :** प्रा. केन्स यांनी आपल्या सिध्दांतात म्हटले आहे की आर्थिक संकटाची अवस्था निर्माण होण्याचे कारण म्हणजे भांडवलाच्या सीमांत लाभक्षमतेत तात्काळ व आकस्मिकपणे झालेली घट होय. प्रा. हेनरी हॅजलिट यांनी ''भांडवलाची सीमांत लाभक्षमता ही संकल्पना संदिग्ध आणि भ्रामक आहे'' अशी टीका केली.

**२) गुणक त्वरकाच्या परस्पर क्रियांकडे दुर्लक्ष :** केन्स यांनी व्यापार चक्राच्या तेजी आणि मंदी या अवस्थांचे विवेचन गुणकाच्या उर्ध्वगामी (Forward) आणि अधोगामी (Backward) कार्यवाहीच्या आधारे केले आहे. उत्पादनात वाढ घडवून आणण्यास कारणीभूत ठरणारा गुणक एकमेव घटक नाही. समुच्चयात्मक चक्रीय उच्चावचेन योग्य विवेचन गुणक व त्वरकांच्या क्रिया प्रतिक्रियाद्वारेच करता येते.

**३) मानसशास्त्रीय नवीन संस्करण :** केन्स यांच्यामते, तेजीच्या विस्फोटाचे महत्वपुर्ण कारण म्हणजे आशावादाची केलेली चूक होय. केन्स यांनी व्यापारचक्रासंबंधी जे विवेचन केले आहे ते पूर्वीच्या मानसशास्त्रीय सिध्दांताप्रमाणेच आहे. त्यामुळे त्यांच्या सिध्दांताला मानसशास्त्रीय सिध्दांताचे नवीन संस्करण म्हटले जाते.

**४) कालावधीच्या क्रमाची अनियमितता :** केन्सच्या मते, उच्चावचेनांच्या क्रमामध्ये आणि कालावधीमध्ये नियमितता आढळून येते. परंतु प्रा. हॅजलिट यांनी याबाबत टीका केली आहे.

**५) सुलभ मुद्रा धोरणाची अपरिणामकारकता :** प्रा. केन्स यांनी मंदीच्या निवारणासाठी सुलभ मुद्रा धोरणाची जी शिफारस केली आहे, हे मत अनेक अर्थशास्त्रज्ञांना मान्य नव्हते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :**

**रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पुर्ण करा.**

१. ................. यांच्या मते, सीमांत लाभक्षमतेतील चक्रीय चढ-उताराचे स्पष्टीकरण म्हणजे व्यापार चक्राचे स्पष्टीकरण होय.

(अ) केन्स (ब) शुंपीटर (क) हॅट्रे (ड) हायके

२. हॅट्रे यांच्यामते ........................झाल्यामुळे व्यापार चक्र निर्माण होतात.

(अ) पत विस्तार व पत संकोच (ब) पत विस्तार

(क) पत संकोच (ड) वरील पैकी नाही.

३. भांडवली वस्तुंच्या उत्पादनात बदल घडवून आणण्यात व्यापारी बँकांचे ................... महत्त्वाचे असते.

(अ) कर्जविषयक धोरण (ब) व्याजदर धोरण

(क) पत संकोच धोरण (ड) वरील पैकी नाही.

४. शुंपीटरच्या सिध्दांतात ............................ या दोहोंना फार महत्वाचे स्थान आहे.

(अ) नवोन्मेष व संयोजक (ब) संयोजक व भांडवलदार

(क) नवोन्मेष व भांडवलदार (ड) वरील पैकी नाही.

५. मंदीला थोपविणाऱ्या दुसऱ्या प्रमुख प्रवृत्तीला ................. यांनी मंदीचा व्यापार असे म्हटले आहे.

(अ) शुंपीटरने (ब) हॅट्रे (क) हायेक (ड) वरील पैकी नाही

### ४.२.३ स्थिरीकरण नीती (Stabilisation Policy) :

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी खुल्या धोरणाचा पुरस्कार केला. त्यांनी शासनाच्या कार्याची व्याप्ती मर्यादीत केली. तथापि, १९२९ मध्ये अमेरिकेत सुरु झालेल्या मंदीने सरकारी हस्तक्षेपाची अवस्था स्पष्ट झाली. जागतिक महामंदीमुळे अमेरिकेबरोबर जगातील इतर अनेक देशांच्या अर्थव्यवस्था कोलमडून पडल्या. मंदीसारख्या भयानक संकटातून बाहेर पडण्यासाठी सरकारने जाणीवपूर्वक हस्तक्षेप करावा असे मत मांडले जाऊ लागले. जे. एम. केन्सने १९३६ मध्ये "General Theory of Employment, Interest and Money" हा ग्रंथ लिहून सरकारी हस्तक्षेपाचे महत्व प्रतिपादन केले. अर्थव्यवस्थेतील स्थूल घटकांमध्ये योग्य संतुलन साधले पाहिजे व याकामी सरकारने आपल्या कार्याचा विस्तार करुन मदत करावी असे मत त्यांनी मांडले. सन १९३० नंतर सरकारी हस्तक्षेप व सरकारच्या कार्याची व्याप्ती वाढत गेली. कल्याणकारी राज्याची संकल्पना (Concept of Welfare State) स्वीकारल्यामुळे सरकारी कार्याचा वेगाने विस्तार झाला आणि सरकारवरील जबाबदाऱ्या वाढत गेल्या. आर्थिक व सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळण्याबरोबर देशाच्या अर्थव्यवस्थेचे स्थैर्य टिकवून ठेवणे हे सरकारचे महत्वाचे कार्य ठरले. व्यापार चक्रांमुळे व इतर असंतुलनामुळे आर्थिक अस्थिरता निर्माण होते. अशी अस्थिरता निर्माण होऊ नये यासाठी सरकार 'स्थिरीकरण नीतीद्वारे' सतत प्रयत्न करीत असते.

**स्थिरीकरण नीती अर्थ व व्याख्या** (Meaning and Definition of Stabilisation Policy) **:**

अलिकडे सर्व देशांमध्ये भांडवली तत्वे रुजू झाली आहेत. व्यापार चक्र हे भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे महत्वाचे वैशिष्ट्ये आहे. अर्थव्यवस्थेत व्यापार चक्रामुळे आर्थिक अस्थैर्य निर्माण होते. ते रोखण्यासाठी सरकारला 'स्थिरीकरण नीती' चा अंगीकार करावा लागतो. 'सरकार जेव्हा आपल्या उत्पन्न-खर्चाद्वारे राष्ट्रीय उत्पन्न, उत्पादन व रोजगार यांच्यावर अपेक्षित परिणाम घडवून आणते व आर्थिक स्थैर्य टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करते तेव्हा सरकारच्या त्या नीतीला स्थिरीकरण नीती असे म्हटले जाते.' वेगळया शब्दांत 'देशातील साधनसामग्रीच्या पर्याप्त वापराची क्षमता वाढविणे आणि चलनाचे मूल्य स्थिर राखणे यासाठी अंगीकारण्यात येणाऱ्या धोरणाला स्थिरीकरण नीती असे म्हणता येईल.'

सन १९२९ च्या जागतिक महामंदीनंतरच्या कालावधीत स्थिरीकरण नीतीला अधिक महत्व प्राप्त झाले. मंदीमुळे भरपाईकृत वित्ताचे महत्व पटले. युध्दसदृश्य परिस्थिती जर निर्माण झाली तरी आर्थिक अस्थिरतेची समस्या निर्माण होते हेही नंतरच्या काळात लक्षात आले. मुक्त अर्थव्यवस्थेत सरकारने हस्तक्षेप केला नाही तर किंमतपातळी आणि रोजगार पातळी यामध्ये मोठया प्रमाणात अस्थैर्य निर्माण होते. अल्पकालीन चढ-उतारांमुळे बेकारी किंवा चलनवाढीची समस्या निर्माण होते. म्हणून सार्वजनिक नीतीने (Public Policy) स्थिरीकरण कार्य प्राधान्याने केले पाहिजे. देशाच्या आर्थिक विकासाबरोबर अस्थिरतेची प्रवृत्ती कमी होण्याऐवजी वाढण्याची जास्त शक्यता असते. यासाठी आर्थिक विकास सुस्थिर पायावर घडवून आणण्याच्या उद्देशाने स्थिरीकरण नीती राबविणे आवश्यक ठरते. बेकारी किंवा चलनवाढ मोठया प्रमाणात झाल्यास सामाजिक आर्थिक अस्थैर्य निर्माण होते. या दृष्टीनेही स्थिरीकरण धोरण महत्वाचे ठरते. मंदीच्या काळात देशातील रोजगार घटणार नाही याची काळजी घेणे; तसेच तेजीच्या काळात भाववाढ फार मोठया प्रमाणात होणार नाही याची काळजी घेणे अशा दुहेरी उद्देशाने ही नीती वापरावी लागते.

थोडक्यात, देशातील रोजगार व भाववाढ स्थिर पातळीवर राखण्यासाठी सरकार जे धोरण राबविते त्या धोरणांना स्थिरीकरण धोरण असे म्हणतात.

अर्थव्यवस्थेतील अस्थैर्याचे विपरीत परिणाम रोजगार व किंमत पातळीवर घडून येतात. अर्थव्यवस्थेत वस्तूं व सेवांचा पुरवठा त्यांच्या मागणीपेक्षा जास्त झाला तर त्यांच्या किंमती घसरु लागतात. यातून चलनघट किंवा भावघटीची प्रवृत्ती निर्माण होते. तसेच वस्तूं व सेवांची मागणी पुरवठयापेक्षा अधिक झाल्यास किंमती वाढू लागतात. त्यातून चलनवाढ किंवा भाववाढीची प्रवृत्ती निर्माण होते. अतिरिक्त चलनवाढ किंवा अतिरिक्त चलनघट दोन्हीही अर्थव्यवस्थेसाठी घातक असतात. आर्थिक अस्थिरतेवर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी स्थिरीकरण धोरणाचा वापर सरकार करते. चलनवाढीची स्थिती निर्माण झाल्यास सरकार करांचे दर किंवा प्रमाण वाढवून लोकांकडील अतिरीक्त खरेदीशक्ती कमी करते, तसेच सार्वजनिक खर्चात कपात करते. याउलट चलनघटीची स्थिती निर्माण झाली तर सरकार करांचे दर किंवा प्रमाण कमी करते तसेच लोकांची खरेदीशक्ती वाढविण्यासाठी सार्वजनिक खर्च वाढविते. अशा प्रकारे सरकार राजकोषीय साधनाद्वारे आर्थिक स्थिरीकरण साधण्याचा प्रयत्न करते.

**स्थिरीकरण धोरणाची उद्दीष्टे (Objectives of Stabilisation Public) :**

पूर्ण रोजगार निर्माण करणे व किंमत पातळीत स्थैर्य राखणे ही स्थिरीकरण धोरणाची प्रमुख दोन उद्दिष्टे आहेत. याशिवाय इतर काही उद्दिष्टांनी हे धोरण वापरली जाते. सर्व उद्दिष्टांचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

**१. पूर्ण रोजगार :** अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार निर्माण करणे हे प्रत्येक देशातील सरकारचे महत्वाचे उद्दिष्ट असते. 'प्रचलित वेतनदारावर पात्रताधारक लोकांना मोठया विलंबाशिवाय उत्पादक स्वरुपाचा रोजगार उपलब्ध होत असेल तर त्या परिस्थितीला पूर्ण रोजगार असे म्हणता येईल.' श्रमाची विभागणी व श्रमाचा पुरवठा यांचा मेळ बसण्याच्या कालावधीत निर्माण होणारी घर्षणात्मक बेकारी येथे गृहीत धरलेली असते. तसेच तांत्रिक, हंगामी किंवा रचानात्मक स्वरुपाची बेकारीसुध्दा निर्माण होऊ शकते. यामुळे पूर्ण रोजगाराच्या ध्येयाला बाधा पोहचत नाही. पूर्ण रोजगार निर्माण करण्यासाठी देशाच्या आर्थिक विकासाचा वेग वाढवावा लागतो. आर्थिक विकासाद्वारे रोजगारसंधीत वाढ होते. यासाठी सरकार स्थिरीकरण धोरण वापरते. सरकारी खर्चात वाढ करते. तुटीच्या अंदाजपत्रकाचा स्वीकार करते. करांचे दर वाजवी ठेवते.

**२. सर्वसाधारण किंमतपातळीत स्थैर्य :** निरनिराळया वस्तू व सेवांच्या किंमतपातळीत चढ-उतार संभवतात. चलनवाढीच्या स्थितीत वस्तू व सेवांच्या किमतीत वाढ होते तर चलनघटीच्या स्थितीत किमतीत घट होते. किंमतपातळीतील बदलांमुळे आर्थिक अस्थिरता निर्माण होते. याचे विपरीत परिणाम अर्थव्यवस्थेवर होतात. स्थिरीकरण धोरणाद्वारे सर्वसाधारण किंमतपातळीत स्थैर्य राखण्याचा प्रयत्न केला जातो.

**३. आर्थिक विषमतेवर नियंत्रण :** समाजामध्ये राष्ट्रीय उत्पन्न व संपत्तीचे वितरण न्याय्य पध्दतीने झाले पाहिजे. आर्थिक विषमता निर्माण होता कामा नये. अल्पसंख्येने भांडवलदार व उत्पादक श्रीमंत असतील व दुसऱ्या बाजूला असंख्य लोक गरीब असताना स्थिरीकरण धोरणाद्वारे ही विषमता दूर केली जाते. श्रीमंत लोकांवर अधिक

कर लावून त्यांच्याकडील उत्पन्न कमी केले जाते व ते उत्पन्न गरिबांवर विविध सुविधांसाठी खर्च केले जाते. तसेच सार्वजनिक खर्च करताना गरीब लोकांच्या कल्याणकारी योजनांना प्राधान्य दिले जाते.

**४. संतुलित विकास निर्माण करणे :** अर्थव्यवस्थेची विभागणी प्राथमिक क्षेत्र, दुय्यम क्षेत्र व तृतीय क्षेत्र अशी केली जाते. यामुळे आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होते. प्राथमिक क्षेत्रात प्रामुख्याने शेती व शेतीशी निगडीत व्यवसायाचा समावेश होतो. उद्योगधंदे व कारखानदारीचा समावेश दुय्यम क्षेत्रात होतो तर सेवा व्यवसायांना एकत्रितपणे तृतीय क्षेत्र असे म्हटले जाते. या तिन्ही क्षेत्रांमध्ये योग्य वाढ घडवून आणणे आवश्यक असते. तसेच निरनिराळ्या राज्यांचा आर्थिक विकासही समान प्रमाणात झाला पाहिजे. संतुलित विकास साधण्याच्या उद्दिष्टाने स्थिरीकरण धोरण वापरले जाते.

**५. आर्थिक स्थैर्य राखणे :** आर्थिक स्थैर्य निर्माण करणे हे या धोरणाचे आणखी एक महत्वाचे उद्दिष्ट असते. चलनवाढ व चलनघटीच्या काळात निर्माण होणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी ही नीती वापरली जाते. यासाठी सरकारी उत्पन्न, खर्च, अंदाजपत्रकीय धोरण इत्यादींमध्ये लवचीकता ठेवली जाते. चलनवाढीच्या किंवा तेजीच्या काळात सरकारी खर्चापेक्षा सरकारी उत्पन्न जास्त ठेवले जाते. याउलट चलनघटीच्या किंवा मंदीच्या काळात सरकारी उत्पन्नापेक्षा सरकारी खर्च जास्त ठेवला जातो. याद्वारे आर्थिक स्थैर्य टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला जातो.

याशिवाय देशातील साधनसामग्रीचा पर्याप्त वापर करणे, आर्थिक वाढीचा वेग शाश्वत करणे, पायाभूत सुविधांचा विस्तार करणे यांसारख्या इतर उद्दिष्टांसाठी स्थिरीकरण धोरण वापरले जाते. या धोरणामुळे स्थैर्यासह आर्थिक विकास साधणे शक्य होते.

### स्थिरीकरण धोरणाची साधने (Instruments of Stabilisation Policy) :

अर्थव्यवस्थेतील तेजी-मंदीचा प्रतिकार करणे व आर्थिक अस्थिरता निर्माण करणाऱ्या इतर घटकांवर नियंत्रण ठेवणे हे स्थिरीकरण धोरणाचे मुलभूत कार्य आहे. अर्थव्यवस्थेतील उच्चावचेन नियंत्रित करणे आणि आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करणे या दृष्टीने या धोरणाची कार्यवाही केली जाते. हे धोरण राबविण्यासाठी प्रामुख्याने पुढील साधने वापरली जातात

**(अ) कर आकारण्याचा अधिकार :** कर हे स्थिरीकरण धोरणाचे एक महत्वाचे साधन आहे. सरकार लोकांच्या उत्पन्नाचा जो हिस्सा काढून घेते त्याला कर (Tax) असे म्हणतात. कर आकारण्याचा अधिकार प्रामुख्याने सरकारला असतो. कर सामान्यतः सक्तीचे देणे असते. तेजी-मंदीच्या चक्रावर नियंत्रण ठेवण्यासाठी करारोपणाचे साधन उपयुक्त ठरते. चलनवाढीच्या किंवा भाववाढीच्या काळात सरकार करांचे दर वाढविते. तसेच नवीन कर लादते. यामुळे लोकांकडील अतिरिक्त क्रयशक्ती घटते. त्यांची प्रभावी मागणी कमी होऊन चलनवाढीला आळा बसतो. याउलट मंदीच्या काळात लोकांची क्रयशक्ती घटलेली असते. क्रयशक्ती वाढविणे क्रमप्राप्त असते. यासाठी सरकार करांचे दर कमी करते. विविध क्षेत्रांना करविषयक सवलतीमुळे उत्पादन व रोजगार पातळी वाढण्यास प्रोत्साहन मिळते. याद्वारे मंदीच्या किंवा चलनघटीच्या समस्येतून बाहेर पडता येते. कराचे साधन परिस्थितीनुसार योग्य प्रमाणात वापरुन स्थिरीकरण नीती यशस्वी करता येते.

**(ब) सार्वजनिक खर्चात बदल :** सार्वजनिक खर्च म्हणजे सरकारमार्फत होणारा खर्च होय. केंद्र, राज्य व स्थानिक पातळीवरील सरकारांमार्फत होणाऱ्या खर्चाला 'सार्वजनिक खर्च' असे म्हणतात. सरकारला निरनिराळ्या बाबींवर खर्च करावा लागतो. संरक्षण, शांतता व सुव्यवस्था, न्याय व्यवस्था, सार्वजनिक खर्च या साधनाद्वारे आर्थिक स्थिरीकरण साधले जाते. मंदीच्या काळात लोकांची प्रभावी  मागणी घटलेली असते. त्यामुळे उत्पादनाचे प्रमाण कमी केले जाते. याचा परिणाम म्हणून बेकारी वाढते. मंदीच्या संकटातून बाहेर पडण्यासाठी मोठया प्रमाणावर सरकारी खर्च करण्याची आवश्यकता असते. सरकार सार्वजनिक कामासाठी पैसा खर्च करते. रस्ते बांधणे, पूल बांधणे धरण बांधणे व इतर पायाभूत सुविधा यासारखी कामे सुरु करुन सार्वजनिक खर्च करते. आर्थिक क्रियांना प्रेरणा देण्यासाठी हा खर्च केला जात असल्याने याला 'समुद्दीपन खर्च' (Pump Priming Expenditure) असे म्हटले जाते. या खर्चामुळे लोकांची क्रयशक्ती वाढते. त्यांच्या प्रभावी मागणीत वाढ होते. मंदीवर याद्वारे मात करता येते. याउलट तेजीच्या काळात चलनवाढीची प्रवृत्ती निर्माण होते. चलनवाढ होऊ नये म्हणून सरकार आपला खर्च मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न करते.

**(क) सार्वजनिक कर्ज :** सार्वजनिक कर्ज हे स्थिरीकरण धोरणाचे आणखी एक महत्वाचे साधन आहे. सार्वजनिक सत्तेने काढलेले कर्ज म्हणजे सार्वजनिक कर्ज होय. केंद्र सरकार, राज्य सरकारे, स्थानिक स्वराज्य संस्था आदींनी काढलेल्या कर्जाला 'सार्वजनिक कर्ज' असे संबोधले जाते. सरकार विविध मार्गांद्वारे कर्जे उभारते. काही वेळा सरकार देशांतर्गत बाजारातून कर्जाची उभारणी करते. विविध संस्थांकडून व भांडवल बाजारातून कर्जे घेतली जातात. तसेच सरकार विदेशातूनही कर्जे उभारते.

आपल्या भारतीय अर्थव्यवस्थेत सार्वजनिक कर्जाची भूमिका महत्वाची ठरली आहे. देशाचे राष्ट्रीय उत्पन्न कमी आहे. यामुळे बचतींचे प्रमाणही अल्प असते. परिणामी भांडवल निर्मिती कमी होते. कर, शुल्क यासारखे उत्पन्नाचे मार्ग वापरण्यावर मर्यादा पडतात. तुटीचा अर्थ भरणा करणे शक्य असले तरी त्यामुळे चलनवाढीचा धोका संभवतो. आर्थिक विकासाला गती देण्यासाठी सार्वजनिक कर्ज उभारणे हाच एक पर्याय महत्वाचा ठरतो.

सरकार सार्वजनिक कर्ज उभारते आणि विशिष्ट मुदतीनंतर त्याची व्याजासह परतफेड करते. चलनवाढीच्या काळात सरकार कर्जे उभारुन लोकांची क्रयशक्ती कमी करण्याचा प्रयत्न करते. चलनघटीच्या किंवा मंदीच्या काळात सरकार पूर्वीच्या कर्जाची रक्कम परत फेडण्यावर भर देते. यामुळे लोकांची क्रयशक्ती वाढून मंदीवर मात करता येते.

**(ड) अंदाजपत्रक :** अंदाजपत्रक हेसुध्दा स्थिरीकरण धोरणाचे एक साधन आहे. अंदाजपत्रकाद्वारे अर्थव्यवस्थेत अपेक्षित बदल घडवून आणता येतात. सामान्यपणे एका वर्षाच्या कालावधीसाठी अंदाजपत्रक तयार केले जाते. अंदाजपत्रकात सरकारी उत्पन्न व खर्चाच्या सर्व बाबींचा तपशील असतो. अंदाजपत्रक हे एक प्रकारचे वित्तीय नियोजन असते. अंदाजपत्रकातील खर्चापेक्षा उत्पन्न जास्त असेल तर त्याला 'शिलकी अंदाजपत्रक' असे म्हणतात. जेव्हा अंदाजपत्रकातील उत्पन्नापेक्षा खर्चाचे प्रमाण जास्त असते तेव्हा त्याला 'तुटीचे अंदाजपत्रक' (Deficit Budget) असे म्हणतात. तसेच जेव्हा अंदाजपत्रकातील उत्पन्न व खर्च या दोन्ही बाबी समान असतात तेव्हा त्याला 'संतुलित अंदाजपत्रक' (Balanced Budget) असे म्हणतात.

अर्थव्यवस्थेत तेजी असेल तर शिलकी अंदाजपत्रकाचा वापर केला जातो. याद्वारे लोकांची जादा झालेली खरेदीशक्ती कमी केली जाते. तसेच मंदीच्या काळात अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी मोठया प्रमाणात खर्च करण्याची आवश्यकता असते. त्यासाठी तुटीचे अंदाजपत्रक सादर केले जाते.

**स्थिरीकरण धोरणाच्या मर्यादा (Limitations of Stabilisation Policy) :**

जागतिक महामंदी घालविण्यासाठी वित्तीय साधनांचा योग्य वापर अतिशय महत्वाचा ठरला. त्यानंतर अनेक देशांनी या साधनांचा उपयोग करुन आर्थिक विकासाचा वेग वाढविला. तेव्हापासून ते आजतागायत मौद्रिक साधने व वित्तीय साधने आर्थिक प्रगतीची साधने म्हणून महत्वाची भूमिका बजावत आहेत. परंतु धोरणाच्या काही महत्वाच्या अडचणी किंवा मर्यादा पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१. वस्तू विनिमय :** विकसनशील राष्ट्रांतील काही व्यवहार हा पैशाच्या मदतीने न होता वस्तू विनिमय पध्दतीने होतो. त्यामुळे मध्यवर्ती बँकेने पैशाच्या पुरवठयात बदल केला तरी त्याचा परिणाम या व्यवहारात होत नाही. त्यामुळे मौद्रिक धोरण अयशस्वी ठरते.

**२. बँकींग व्यवसायाची सवय :** विकसनशील राष्ट्रातील लोकांची बँक व्यवहाराची सवय, अविकसित हुंडी बाजार, बँकांचा दुषित व्यवहार या सर्वांचा परिणाम देशातील मध्यवर्ती बँकांचा बँकदर, रोख्यांची खरेदी विक्री व इतर मौद्रिक साधने अयशस्वी ठरविण्यावर होतो.

**३. लोकांचा अल्प प्रतिसाद :** मौद्रिक धोरणात बदल करणे सरकारच्या हाती असते पण त्याला किती प्रतिसाद द्यावयाचा हे लोकांवर अवलंबून असते. मंदीच्या काळात तर या धोरणाला फारसा प्रतिसाद मिळत नाही हा अनुभव आहे. कारण मंदीच्या काळात व्याजदरात मोठया प्रमाणात घट करुनही गुंतवणूक व कर्ज मागणी वाढत नाही. अशा वेळी इतर प्रेरणांचा शोध घेणे भाग पडते. त्यामुळे मौद्रिक धोरणाचे यश तेजी रोखण्यात जेवढे असते तेवढे मंदी घालविण्यात नसते.

**४. धोरणात्मक कालावधी (पाश्चायन)** (Policy Lag) **:** विकसनशील व विकसित राष्ट्रातील मौद्रिक धोरणाच्या यशात फरक असण्याचे आणखी एक कारण म्हणजे मध्यवर्ती बँकेच्या आर्थिक उद्दिष्टांची निश्चिती व त्या संदर्भात करावयाची कार्यवाही यात जे पाश्चायन (Lag) असते ते देशानुरुप बदलणारे असते. शिवाय हे पाश्चायन विकसनशील राष्ट्रांत जास्त असते. पाश्चायनाचा काळ जेवढा दीर्घ तेवढया प्रमाणात धोरणाचे यश कमी असते.

अलीकडच्या काळात वित्तीय धोरणाच्या परिणामकारकतेविषयी फारशी उलटसुलट चर्चा होत नाही. यातच या धोरणाचे यश सामावलेले आहे. तरीपण या धोरणाची अंमलबजावणी करताना ती केव्हा करावी, त्यासाठी कोणत्या साधनांचा उपयोग केव्हा व किती काळ करावा यासारखे विविध प्रश्न उभे राहतात. उदा. देशात कर व सार्वजनिक खर्च यामध्ये एकाच वेळी बदल करता येत नाही. तसेच त्यांचा परिणाम त्वरित लक्षात येत नाही. त्यासाठी काही काळ जाऊ द्यावा लागतो. अशा काळाला पाश्चायन (Lag) म्हणतात. यामध्ये मान्यता कालावधी, प्रशासकीय कालावधी व कार्य कालावधी इ. चा समावेश होतो.

**५. अंदाज वर्तविणे :** स्थिरीकरण धोरणाची यशस्विता आर्थिक बदलाच्या काटेकोर अंदाजावर अवलंबून असते. अंदाज जेवढा परिपूर्ण असेल तेवढा पाश्चायन काल कमी असतो व आखलेले धोरण यशस्वी ठरते. अमेरिकन अर्थव्यवस्थेतील घडामोडींचा अंदाज वर्तविण्यासाठी ३० निर्देशकांचा उपयोग यशस्वी केला जातो.

**६. वित्तीय निवड :** वित्तीय धोरणाची महत्वाची मर्यादा अशी की, मौद्रिक धोरणाचा परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होतो, त्यात भेदाभेद नसतो. याउलट वित्तीय धोरणाचा परिणाम हा विशिष्ट गट, समूह, विभाग यावर होणारा असतो, त्यामुळे हा भेदाभेदाचा असतो. वित्तीय धोरणाचा परिणाम धोरण राबविणाऱ्या घटकाने ठरविलेल्या मूल्यानुसार होतो. त्यामुळे वित्तीय धोरणचे यशापयश हे अर्थव्यवस्थेतील मूल्य निर्धारकावर अवलंबून असते.

**७. वित्तीय साधनांची अपूर्णता :** वित्तीय साधनांच्या संदर्भात असे म्हटले जाते की, यांचा मंदीच्या काळात करण्यात आलेल्या उपयोग अपयशी ठरतो. मंदी घालविण्यासाठी सरकार सार्वजनिक खर्चात वाढ किंवा कपात करते. त्यातून लोकांची खरेदीशक्ती वाढून मागणी व उत्पादनाला चालना मिळावी हा हेतू असतो. पण लोकांनी आपले वाढलेले उत्पन्न खर्चासाठी उपयोगात आणले नाही तर वित्तीय साधनांचा परिणाम अर्थव्यवस्थेत अपेक्षेनुसार दिसून येत नाही.

**८. बेकारीवर उपाय :** देशात जेव्हा प्रभावी मागणीच्या कमतरतेतून बेकारी उद्भवते, अशा वेळी वित्तीय साधने प्रभावी मागणीत वाढ करुन बेकारीचा प्रश्न सोडवू शकतात. पण जर देशातील बेकारी छुपी किंवा रचानात्मक असेल तर ती दूर करण्यात वित्तीय साधने अपुरी ठरतात. त्यामुळे स्थिरीकरण धोरणाला मर्यादा येतात.

**९. वाढत्या वेतनाची मागणी :** बेकारी निवारण्याच्या दृष्टीने सरकार जेव्हा सार्वजनिक खर्चात वाढ व करात सवलत देते, त्यामुळे प्रभावी मागणी वाढून बेकारी दूर व्हावी ही अपेक्षा असते. पण जेव्हा प्रभावी मागणीच्या वाढीबरोबर वस्तूंच्या किंमती वाढू लागतात तेव्हा उत्पादकाचा नफा वाढतो व त्यातून अधिक उत्पादनाची चालना मिळून रोजगार वाढू लागतो. अशा परिस्थितीत कामगार संघटनांनी आपल्या वेतनात वाढ करुन मागितली व त्यातून वेतनदर वाढू लागले तर त्याचा परिणाम उत्पादकांचा नफा घटण्यावर होतो. त्यामुळे उत्पादक उत्पादन घटकांची मागणी कमी करतात. याचा परिणाम सरकारचे वित्तीय धोरण यशस्वी ठरण्यात मर्यादा पडतात.

**१०. खाजगी गुंतवणुकीवर परिणाम :** सार्वजनिक खर्चामुळे अर्थव्यवस्थेत मजूर व इतर उत्पादन घटकांची मागणी वाढते. त्यामुळे त्यांच्या मोबदल्यात वाढ होते व त्याचा परिणाम खाजगी गुंतवणूकदारांवर होतो. कारण खाजगी उत्पादकांना सरकारशी स्पर्धा करावी लागते. ते सरकारशी स्पर्धा करु शकत नाही. त्याचा परिणाम देशातील खाजगी गुंतवणूक घटण्यावर होतो. अशा प्रकारे सार्वजनिक खर्चात वाढ होताना खाजगी गुंतवणूक कमी होणार नाही याची काळजी स्थिरीकरण धोरणात घेतली गेली पाहिजे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :**

**रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पुर्ण करा.**

१. ..................तील महामंदीपासूनच्या काळात स्थिरीकरण नीतीला अधिक महत्व प्राप्त झाले.
(अ) अमेरीका (ब) भारत (क) जपान (ड) वरील पैकी नाही.

२. स्थिरीकरण नीतीची खालीलपैकी........................ उद्दिष्टे आहेत.
(अ) संतुलित विकास (ब) आर्थिक स्थैर्य (क) पुर्ण रोजगार (ड) वरील पैकी सर्व

३. स्थिरीकरण नीतीची ........................... साधने आहेत.
(अ) कर (ब) सार्वजनिक खर्च (क) अंदाजपत्रक (ड)वरील पैकी सर्व

४. आर्थिक क्रियांना प्रेरणा देण्यासाठी खर्च केला जात असल्याने याला ................... असे म्हटले जाते.
(अ) सार्वजनिक खर्च (ब) सार्वजनिक कर्ज (क) समुद्दीपन खर्च (ड) वरील पैक नाही

५. भारतासारख्या विकसनशील देशात ................. भूमिका महत्वाची ठरली आहे.
(अ) सार्वजनिक खर्च (ब) सार्वजनिक कर्ज (क) समुद्दीपन खर्च (ड) वरील पैक नाही

## ४.३ सारांश (Summary) :

**(A)** व्यापार चक्र या संकल्पनेचा अर्थ अर्थशास्त्रात, अर्थव्यवस्थेतील लाटांसारख्या एकूण आर्थिक व्यवहारात होणाऱ्या चढ-उतारांना चक्रे म्हणतात. आर्थिक व्यवहारातील चढ-उतारांना व्यापार चक्रे असे म्हणतात. अर्थव्यवस्थेत असलेल्या गतिमान शक्ती वेगवेगळया प्रकारचे आर्थिक चढ-उतार किंवा स्थित्यंतरे निर्माण करतात. त्यांच्या ठळक वैशिष्टयांनुसार त्यांचे दिर्घकालीन प्रवृत्ती, हंगामी चढ-उतार, चक्रीय चढ-उतार आणि यादृच्छिक चढ-उतार असे एकूण चार प्रकारात वर्गीकरण केले जाते. यातील चक्रीय चढ-उतारांना व्यापार चक्रे असे म्हणतात. ते अर्थव्यवस्थेच्या कार्यपध्दतीत अनेक अडथळे निर्माण करतात. त्यामुळे व्यापार चक्रांच्या अभ्यासास अधिक महत्व आहे.

**(B)** हॉट्रे यांच्यामते, मुद्रा परिमाणातील बदलामुळे अर्थव्यवस्थेत चक्रीय उच्चाटणे घडून येतात. मुद्रा स्फितीच्या काळात जनतेच्या हातात अधिक क्रयशक्ती येते. क्रयशक्तीत वाढ झाली तर वस्तुंची मागणी वाढते वस्तुंच्या किंमती वाढतात. उत्पादनात व रोजगारात वाढ होते. याउलट मुद्रा संकोच घडून आलातर जनतेच्या हातातील क्रयशक्तीत घट होते आणि क्रयशक्तीत घट झालीतर वस्तुंच्या मागणीत घट होते वस्तूंच्या किंमती कमी होतात. उत्पादनात घट होते, बेकारी वाढते. हायेकचा सिध्दांत उत्पादक वस्तू आणि उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनातील संतुलनावस्थेचे विश्लेषण करणारा आहे. उत्पादन पध्दतीला उत्पादन रचना म्हटले आहे. उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाची खालची पातळी मानली जाते तर भांडवली वस्तुंच्या उत्पादनाची वरची पातळी मानली जाते. उत्पादनाच्या घटकाचा अवलंब केल्यापासून वस्तुंचे प्रत्यक्ष उत्पादन होईपर्यंत जो कालावधी लागतो त्याला उत्पादन कालावधी म्हटले जाते. अधिक भांडवल प्रधान किंवा अप्रत्यक्ष उत्पादन पध्दतीचा अवलंब केला तर उत्पादनाच्या कालावधीत वाढ होते. शुंपीटरच्या मते भांडवलशाही अर्थव्यवस्था जर स्थिर राहिली तर अर्थव्यवस्थेत व्यापार चक्रे निर्माण होणार नाहीत. स्थिर अर्थव्यवस्थेत उपभोक्त्याच्या आवडी निवडी कायम राहतात. त्यामुळे व्यापार चक्रांची निर्मिती होत नाही. युध्द, दुष्काळ, सरकारी कायदा यासारख्या बाह्य घटकांमुळे अर्थव्यवस्थेत होणारे चढ उतार व्यापार चक्रातील तेजी मंदीच्या अवस्थेप्रमाणे नियीमत असणार नाही म्हणून त्यांना व्यापार चक्रे असे म्हणता येणार नाही. केन्सचा 'रोजगार व्याज व पैशाचा सामान्य सिद्धांत' हा ग्रंथ व्यापार चक्र विश्लेषणाच्या विकासातील एक महत्वपुर्ण घटना होय. त्यांचा सिध्दांत उत्पन्न निर्धारणाच्या दृष्टीने महत्वाचा असला तरी केन्स यांचे व्यापार चक्रातील योगदान प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या महत्वपूर्ण ठरते.

**(C)** अलीकडे बहुतेक सर्व देशांमध्ये भांडवलवादी तत्वे रुजू झाली आहेत. व्यापार चक्र हे भांडवलवादाचे एक महत्वाचे वैशिष्ट्य आहे. अर्थव्यवस्थेत तेजी-मंदीचे चक्र कार्यरत असते. या चक्रामुळे आर्थिक अस्थैर्य निर्माण होते. ते रोखण्यासाठी सरकारला 'स्थिरीकरण नीती' चा अंगीकार करावा लागतो. 'सरकार जेव्हा आपल्या उत्पन्न-खर्चाद्वारे राष्ट्रीय उत्पन्न, उत्पादन व रोजगार यांच्यावर अपेक्षित परिणाम घडवून आणते व आर्थिक स्थैर्य टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करते तेव्हा सरकारच्या त्या नीतीला स्थिरीकरण नीती असे म्हटले जाते.' वेगळ्या शब्दांत 'देशातील संसाधनाच्या पर्याप्त वापराची क्षमता वाढविणे आणि चलनाचे मूल्य स्थिर राखणे यासाठी अंगीकारण्यात येणाऱ्या धोरणाला स्थिरीकरण नीती असे म्हणता येईल.'

## ४.४ पारिभाषिक शब्द (Glossary) :

**१. व्यापार चक्र** (Business Cycle) **:** एकूण आर्थिक व्यवहारातील स्थित्यंतरे म्हणजे व्यापार चक्र होय.

**२. मंदी** (Depression) **:** जेव्हा अर्थव्यवस्थेतील वस्तुंच्या किंमती घटत असतात तसेच उत्पादन, रोजगार, मागणी, पुरवठा इत्यादी आर्थिक घटकातील मोठया प्रमाणात घट होत असते. अर्थव्यवस्थेच्या आशा अवस्थेस मंदी म्हणतात.

**३. सार्वजनिक खर्च** (Public Expenditure) **:** सरकारने सर्वसामान्य लोकांच्या हितासाठी केलेल्या खर्चास सार्वजनिक खर्च असे म्हणतात.

**४. चक्रीय बेकारी** (Cyclical Unemployment) **:** वस्तुंच्या सापेक्ष किंमतीत होणाऱ्या बदलामुळे वस्तुंच्या मागणीत घट होते व याचा परिणाम त्या वस्तुंच्या उत्पादन घटकावर होतो. त्यातून जी बेकारी निर्माण होते त्या बेकारीस चक्रीय बेकारी असे म्हणतात.

**५. आर्थिक स्थिरीकरण** (Economic Stabilization) **:** अर्थव्यवस्थेतील वस्तूची किंमत, मागणी, पुरवठा, बचत, गुंतवणूक व इतर घटक यांच्यात विशिष्ट काळात जेव्हा फारसे चढ उतार होत नाहीत त्यास आर्थिक स्थिरीकरण म्हणतात.

**स्वयं अध्ययनाच्या प्रश्नांची उत्तरे :**

४.२.१ १) क्लेमेद व जुगलर २) वरील पैकी सर्व ३) वरील पैकी सर्व ४) वरील पैकी सर्व ५) मिचेल

४.२.२ १) केन्स २) पत विस्तार व पत संकोच ३) कर्जविषयक धोरण ४) नवोन्मेष व संयोजक ५) शुंपीटरने

४.२.३ १) अमेरिका २) वरील पैकी सर्व ३) वरील पैकी सर्व ४) समुद्दीपन खर्च ५) सार्वजनिक खर्च

## ४.५ सरावासाठी प्रश्न (Excercise) :

**(अ) टिपा लिहा.**

१. व्यापार चक्राच्या अवस्था.
२. व्यापार चक्राची वैशिष्टये.
३. स्थिरीकरण नितीच्या मयादा

४. स्थिरीकरण नीतीची साधने.

५. स्थिरीकरण नितीचा अर्थ.

**(ब) दिर्घोत्तरी प्रश्न.**

१. व्यापार चक्र म्हणजे काय? व्यापार चक्राच्या अवस्था सांगा.

२. व्यापार चक्राच्या मौद्रिक सिध्दांताचे परिक्षण करा.

३. हायेक यांच्या व्यापार चक्र सिध्दांताचे स्पष्टीकरण करा.

४. केन्सच्या व्यापार चक्र सिध्दांताचे परिक्षण करा.

५. हॉट्रे यांनी प्रतिपादन केलेल्या व्यापार चक्राच्या सिध्दांताचे स्पष्टीकरण करा.

६. स्थिरीकरण नीती म्हणजे काय? तिची उद्दिष्टे स्पष्ट करा.

७. स्थिरीकरण नीतीची साधने स्पष्ट करा.

८. स्थिरीकरण नीतीच्या मर्यादा स्पष्ट करा.

## ४.६ अधिक वाचनासाठी संदर्भ :


1. Ackely G. (1978) : 'Macro Economics - Theory and Policy', Macmillian, New York.
2. Awasthi G. D. (1982) : 'Macro Economic Theory', Prakashan Kendra, Lucknow - 7.
3. Jhingan M. L. (1986) : 'Macro Economic Theory', Konark Publication Pvt. Ltd. Delhi.
4. Mithani D. M. (2004) : 'Money, Banking and Public Finance', Himalaya Publishing House, Mumbai.
5. Mithani D. M. (2010) : 'Macro Economics', Himalaya Publishing House, Mumbai.
6. Sundharam K.P.M. (1998) : 'Money, Banking and International Trade', Sultan Chand & Sons, New Delhi.
7. Vaish M. C. (1983) : 'Macro Economic Theory', Allied Publishers Private Limited, New Delhi.
8. Vaish M. C. (2002) : 'Macro Economic Theory', Vikas Publishing House, New Delhi.